दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २४० I शनिवार १३ जून २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



भारत देश की सर्वश्रेष्ठ खुशबू

लई भारी ! १ नंबर

परिमल भारतवासी




तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी निळकंठ, शुभलाभ १२० ग्रॅम ६इन१ पाऊच रु. ५०मध्ये

अगरबत्ती चे जिल्हा वितरक व कापुर, शेंदूर, अत्तर, धुप, होलसेल व रिटेल साठी

केवल अगरबत्ती

हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.


## महत्त्वाचे..

### भीषण 'एल निनो' सक्रिय; भारतावर दुष्काळाचे सावट?

पुणे : प्रशांत महासागरात एल निनो सक्रिय झाल्याची घोषणा सीपीसी अर्थात क्लायमेट प्रेडीक्शन सेंटरने केली आहे. यंदा १९५० नंतरचा सर्वाधिक तीव्र 'एल निनो' राहण्याचा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे. एल निनो डिसेंबरमध्ये अति तीव्र होऊ शकतो असा अंदाज देखील आहे. २०२७ च्या पूर्वार्धातही 'एल निनो' सक्रिय असेल असा कयास बांधला जात आहे. प्रशांत महासागरातील न्यूट्रल स्थिती जाऊन एल निनो निर्माण झाल्याची घोषणा अमेरिकी हवामानशास्त्र संस्था नोआच्या क्लायमेट प्रेडिक्शन (सीपीसी) सेंटरने गुरुवारी केली. डिसेंबरपर्यंत एल निनोची तीव्रता अतितीव्र स्वरूपाची होणार असून, यंदाचा एल निनो १९५० पासूनच्या नोंदींमधील सर्वाधिक तीव्र ठरण्याची शक्यता सीपीसीने वर्तवली आहे. सीपीसीने गुरुवारी जारी केलेल्या अंदाजानुसार, गेल्या महिनाभरात एल निनोची स्थिती विकसित झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

# महिला शेतकऱ्यांना मिळणार वैधानिक 'शेतकरी' दर्जा

## विधिमंडळात येणार विधेयक, मुख्यमंत्र्यांचे निर्देश


प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** राज्यातील महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६' पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथील वर्षा निवासस्थानी 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक, २०२६' संदर्भात बैठक पार पडली. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१% हून अधिक महिलांचा सहभाग आहे. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणाऱ्या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे. सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा. कृषी क्षेत्रातील महिलांना 'शेतकरी' म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा, पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन असे विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी (पान ४ वर)

### कांदा खरेदी दरात वाढ



**सरकारने कांदा खरेदीच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असून यापुढे १६.५० रुपये प्रति किलो दराने कांद्याची खरेदी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, सरकारने 'बफर स्टॉक' (राखीव साठा) कार्यक्रमांतर्गत कांदा खरेदीचा दर सध्याच्या १५.८० रुपये प्रति किलोवरून वाढवून १६.५० रुपये प्रति किलो केला आहे. हा नवीन दर शनिवारपासून म्हणजे १३ जूनपासून लागू होईल. देशातील सर्वाधिक कांदा उत्पादन करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी, लागवडीचा वाढलेला खर्च लक्षात घेता ३० रुपये प्रति किलो खरेदी दराची मागणी केली आहे. बाजारातील चढ-उतार नियंत्रित करण्यासाठी (मार्केट इंटरव्हेंशन) 'किंमत स्थिरीकरण निधी' अंतर्गत दरवर्षी हा राखीव साठा (बफर स्टॉक) तयार केला जातो. सरकारने या वर्षासाठी २ लाख टन खरेदीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे; हे प्रमाण मागील वर्षीच्या (२०२५-२६) ३ लाख टन खरेदीच्या तुलनेत कमी आहे.**

### सहजयोगाचा आनंद...



'सहजयोग'

भाग ८०

मी आपल्याला सत्याबद्दल सांगितलं होतं. सत्य काय आहे ? सत्य आणि असत्य यातला फरक कसा ओळखायचा.आपण सत्य का शोधतो ते बघितलं पाहिजे. आज या कलियुगात अनेक असे प्रकार दिसून येतात की मनुष्य घाबरून जातो. त्याला समजत नाही की हे सर्व काय चालले आहे आणि ही कलियुगाची विशेषता आहे की मनुष्याला भ्रांती पडते. त्याला भ्रांती होते आणि त्या भ्रांतीतून तो बावचळून जातो. घाबरून जातो. त्याला समजत नाही की सत्य काय आहे, मी कुठे चाललोय, जग कुठे चाललंय असे अनेक प्रश्न त्याच्या डोक्यात डोकावतात. हे आपल्या महाराष्ट्रातच नव्हे, भारतातच नव्हे पण सर्व जगात आहे. प्रचीती मिळणे हीच खरी ओळख आहे. प्रचीती शिवाय कोणत्याही गोष्टीवर भाळून जाणं हे काही बरोबर नाही. तर मी महाराष्ट्रात जेव्हा कार्याला सुरुवात केली तेव्हा सगळ्यांनी सांगितलं 'माताजी, इथे पायलीचे पन्नास गुरू आहेत,म्हटलं 'अरे बापरे, आता कसं काय होणार? आणि लोकांना काय आमचे हे गुरू, आमचे ते गुरू. अहो, त्यांच्यापासून काही लाभ झालाय का तुम्हाला? त्यांची काही प्रचीती आली का तुम्हाला? तेव्हा का तुम्ही त्यांच्या मागे धावता ? अहो, शोधायला पाहिजे पण जो समोर येऊन उभा राहिला त्याला तुम्ही गुरू कसे म्हणता? आणि असे अनेक अगुरू या महाराष्ट्रात तर फारच जास्त बोकाळले आहेत त्याबद्दल काही शंका नाही. पण पुढे जाऊन लक्षात आलं माझ्या की इथे लोकांना फारच कष्ट आहेत, फारच त्रास आहे, अनेक तऱ्हेचे त्रास आहेत आणि अनेक तऱ्हेने जे गांजलेले आहेत तेव्हा या लोकांना जर सत्य मिळाले तर नंतर हे सहजयोगात उतरतील आणि सहजयोगाचा आनंद घेतील. या सागरात उतरल्यावर मग त्यांना कळेल की आनंद काय असतो. २५ मार्च १९९९,पुणे

अधिक माहितीसाठी
www.sahajayogamumbai.org
8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# मुरूम टाकण्याच्या वादातून शेतकऱ्याचा कुऱ्हाडीने खून

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा प्रतिनिधी :** तालुक्यातील पिसोरेखांड येथील गावडेमळा परिसरात शेताच्या बांधावर मुरूम टाकण्याच्या किरकोळ कारणावरून एका ७८ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा कुऱ्हाडीने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. १२ जून) सकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

याबाबत विजय पोपट गावडे (रा. गावडेमळा, पिसोरेखांड) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत पोपटराव रावजी गावडे (वय ७८) यांचा शेतातील बांधावर मुरूम टाकण्याच्या कारणावरून वाद झाला होता. या वादातून आरोपी विलास दादा गावडे याने पोपटराव गावडे यांच्या डोक्यात कुऱ्हाडीने वार केल्याचा आरोप आहे. गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमन, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर करीत आहेत.

दरम्यान, घटनेनंतर आरोपी विलास गावडे हा फरार झाला असून त्याला ताब्यात घेण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेमुळे पिसोरेखांड परिसरात हळहळ व्यक्त होत असून, आरोपीला तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पहिला खून दडपला म्हणून दुसरा केल्याची जोरदार चर्चा ?

**मागील काही दिवसापूर्वी यातील आरोपीने असाच एक खून केला होता मात्र सर्वांचे मदतीने तो दडपला गेल्यामुळे दुसरा खून केल्याची जोरदार चर्चा रंगतदार दिसले आहे त्यामुळे पोलिसांनी त्याही पद्धतीने तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे.**

# वाळूतस्कारानी केलेल्या खड्ड्यामुळे तरुणाचा बळी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील कान्हेगाव,लाख,जातप, करजगाव प्रवरा नदीपात्रात अवैधरित्या वाळूचा मोठ्या प्रमाणावर उपसा दिवसरात्र सुरू आहे.विशेष म्हणजे नदीला पाणी असून तरी वाळूतस्कर वाळूची दिवसरात्र लुट केली जात आहेत.

मात्र, प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे तसेच अवैध वाळू तस्करांनी केलेल्या मोठमोठ्या खोल खड्ड्यांमुळे एका निष्पाप युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.राहुल अशोक बर्डे (वय २१, रा.कान्हेगाव ता.श्रीरामपूर) असे दुर्दैवी मृत्यू झालेल्या युवकांचे नाव आहेत.

सध्या कान्हेगाव, लाख, जातप, करजगाव परिसरातील प्रवरानदीपात्रातून गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहेत.


याच बेकायदेशीर उत्खननामुळे नदीपात्रात अनेक ठिकाणी खोलखोल खड्डे पडले झाले आहेत. सध्या पिण्याच्या पाण्यासाठी सोडण्यात आलेल्या पाण्यामुळे बांधारा भरलेला असून हे खड्डे पाण्याखाली झाकले गेले आहेत.या परिस्थितीचा अंदाज येत नसल्याने अशा दुर्दैवी घडत आहेत.

यात धोकादायक बाब म्हणजे मेंढ्यांना पाणी पाजण्यासाठी गेलेल्या एका २१ वर्षीय तरुणाचा पाय घसरून खोल खड्ड्यात पडल्याने दुर्दैवी बुडून मृत्यू झाला. या घटना अत्यंत दुर्दैवी व संतापजनक प्रकार असून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे एका निष्पाप युवकाचा जीव गेल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

प्रशासनाने ग्रामस्थांनी वेळोवेळी अवैध वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस प्रशासनाकडे तक्रारी करूनही प्रभावी कारवाई झालेली नाहीत.या परिणामी नदीपात्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नागरिकांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहेत.वाळू उपशामुळे नदीपात्रात सध्या मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यांचा अंदाज न आल्यामुळे राहुलचा मृत्यू झाला.या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित वाळू तस्करांवर तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी नदीपात्रातील धोकादायक खड्ड्यांची पाहणी करून योग्य उपाययोजना करण्यात याव्यात, अशी ग्रामस्थांची व प्रवरा बचाव कृती समिती पदाधिकाऱ्यांनी मागणी केली आहेत.

### चप्पूच्या सहाय्याने नदीपात्रातून वाळूचा उपसा?

**सध्या मोठ्या प्रमाणावर प्रवरानदीपात्रातून चप्पूच्या सहाय्याने वाळूची लुट केली जात आहे. रात्रीवेळीला नदीतून वाळूचा उपसा करत बाहेर काढला जातो. अशी नदी काठवरील गावातील परिस्थिती पहायला मिळते.**



# ४० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा विनाअट लाभ : फडणवीस

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** कर्जमाफी आम्ही केलेली आहे, या कर्जमाफीमध्ये कुठल्याही अटी आणि शर्थी आम्ही टाकलेल्या नाहीत. एकच अट आम्ही टाकलेली आहे ती महाराष्ट्रातील बँकिंग यंत्रणा आहे, त्यातल्या त्यात जिल्हा सहकारी बँका टिकल्या पाहिजेत, यासाठी ती अट टाकली आहे. ज्यांना वारंवार माफी मिळालेली आहे, त्यांच्याकरता आम्ही यावेळी माफी करणार आहोत. मात्र, ती एका फिक्स रकमेपर्यंत त्यांची माफी करणार आहोत, उरलेले पैसे त्यांनी भरायचे आहेत. अन्यथा आपली बँकिंग यंत्रणा पूर्णपणे उद्धवस्त होईल. बाकी ४० लाख शेतकऱ्यांना विना अट कर्जमाफीचा फायदा मिळणार आहे. आम्ही कर्जमाफी संदर्भात एक उपसमिती तयार केलीली आहे. मी आणि दोन्ही उपमुख्यमंत्री आणि इतर काही मंत्र्यांचा त्यात समावेश असेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १२ वर्ष पंतप्रधान पदाची कारकिर्द (पान ४ वर)

### जिल्हा सहकारी बँका टिकाव्यात म्हणून ठेवली एक अट

# पंढरपुरात रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन सुरू

## सरसकट कर्जमाफीसाठी सरकारविरोधात एल्गार

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**पंढरपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी गुरुवारी पंढरपूर येथे अन्नत्याग आंदोलन सुरू केले.

राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, कर्जमाफीवरील जाचक अटी रद्द कराव्यात आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सरकारने ठोस भूमिका घ्यावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंढरपुरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह विविध भागांतून आलेले शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोहित पवार यांनी आंदोलन सुरू करण्यापूर्वी सरकारवर शेतकरी प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी अन्नत्याग आंदोलनाचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, सोलापूर जिल्हा प्रशासनाने रोहित पवार यांना पत्र देत विधान परिषद निवडणुकीची (पान ४ वर)

# रुग्णालयातीलच मेडिकलमधून औषध खरेदीची सक्ती करणाऱ्यांना दणका...

## रुग्णांवर दबाव आणल्यास कारवाईचा तुकाराम मुंढे यांचा इशारा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** रुग्णालयांमध्ये दाखल असलेल्या रुग्णांना संबंधित रुग्णालयाच्या मेडिकल स्टोअरमधूनच औषधे खरेदी करण्यास भाग पाडणाऱ्या रुग्णालयांना अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठा दणका दिला आहे. रुग्णांनी औषधे कुठून खरेदी करावीत हा त्यांचा कायदेशीर आणि वैयक्तिक अधिकार आहे.

कोणतेही रुग्णालय किंवा संस्था त्यांच्यावर स्वतःच्या फार्मसीमधूनच औषधे घेण्याची सक्ती करू शकत नाही, असा स्पष्ट आणि महत्त्वपूर्ण आदेश एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जारी केला आहे.

राज्यातील अनेक खासगी तसेच काही मोठ्या रुग्णालयांविरोधात रुग्ण आणि नातेवाइकांकडून सातत्याने तक्रारी प्राप्त होत होत्या. रुग्णालयाच्या परिसरातील मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडले जात असल्याने रुग्णांना जास्तीचा (पान ४ वर)



हा केवळ सल्ला नसून अधिकृत शासकीय आदेश आहे. कोणतेही रुग्णालय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या फार्मसीमधून औषधे घेण्यास भाग पाडत असल्यास संबंधित नागरिक एफडीएकडे थेट तक्रार दाखल करू शकतात. अशा प्रत्येक तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधित रुग्णालयावर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

**- तुकाराम मुंढे,**
अन्न-औषध प्रशासन आयुक्त

# शेअर बाजारातील नुकसानीने कुटुंब उद्ध्वस्त!

## मुख्याध्यापकाची पत्नी व दोन मुलांसह आत्महत्या

### १.८० कोटींच्या कर्जाच्या विवंचनेतून टोकाचे पाऊल, २२ पानी पत्रातून उलगडली आर्थिक संकटाची कहाणी

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात एका मुख्याध्यापकाने पत्नी आणि दोन मुलांची हत्या करून स्वतः आत्महत्या केल्याची अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत असून शिक्षण क्षेत्रातही शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, योगेश पाटील हे नंदुरबार जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. बार्शी तालुक्यातील हत्तीज हे त्यांचे मूळ गाव आहे. त्यांनी पत्नी माधुरी पाटील, मुलगा अथर्व आणि शिवांश यांचा जीव घेतल्यानंतर स्वतःही आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.



या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला असता २२ पानी पत्र सापडले. या पत्रामध्ये शेअर बाजारातील गुंतवणुकीत झालेल्या मोठ्या आर्थिक (पान ४ वर)

### तातडीने कोंडी सोडवावी

मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्त केले. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे मोठे आर्थिक व्यवहार करता येत नाहीत. त्यामुळे सरपंचांची कोंडी झाली असून स्थानिक विकासकामे ठप्प झाली आहेत. ग्रामपंचायतींचा आर्थिक कारभार पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाने तातडीने कोंडी सोडवावी.

**- जयंत पाटील कुर्डुकर**
अध्यक्ष- अखिल भारतीय सरपंच परिषद

# तुकाराम मुंढे : व्यवस्थेला जागे करणारा अधिकारी

भारतीय प्रशासकीय सेवेत अनेक अधिकारी येतात, काही काळ चर्चेत राहतात आणि नंतर विस्मृतीत जातात. परंतु काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे नाव एखाद्या पदाशी जोडले जात नाही, तर प्रामाणिकपणा, धाडस आणि जनहिताची भूमिका यांचे प्रतीक बनते. तुकाराम मुंढे हे असेच एक नाव आहे. सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून ते कार्यरत असले तरी त्यांच्या कामाची चर्चा केवळ एका विभागापुरती मर्यादित राहिलेली नाही. फळे, भाजीपाला, दूध, औषधे, नशेच्या पदार्थांची विक्री, भ्रामक जाहिराती आणि आरोग्य क्षेत्रातील गैरप्रकार याविरोधात त्यांनी सुरू केलेल्या मोहिमेमुळे ते पुन्हा एकदा राज्यभर चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

तुकाराम मुंढे यांची पार्श्वभूमी संघर्षमय आहे. बीड जिल्ह्यातील एका सामान्य शेतकरी कुटुंबातून ते पुढे आले. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळवले. त्यामुळे सामान्य माणसाच्या अडचणी आणि व्यवस्थेतील त्रुटी यांची त्यांना जवळून जाणीव आहे. प्रशासनात प्रवेश केल्यानंतर त्यांनी अनेक ठिकाणी काम केले, मात्र प्रत्येक ठिकाणी त्यांनी आपली स्वतंत्र कार्यशैली निर्माण केली. नियमांचे काटेकोर पालन, कोणत्याही दबावाला न झुकणे आणि जनहिताला प्राधान्य देणे ही त्यांची ओळख बनली.

नवी मुंबई, नाशिक, पुणे, नागपूर, मुंबई तसेच राज्य परिवहन महामंडळातील विविध जबाबदाऱ्यांदरम्यान त्यांनी घेतलेले निर्णय अनेकदा वादग्रस्त ठरले, पण त्यामागे सार्वजनिक हिताचा स्पष्ट दृष्टिकोन होता. अनधिकृत बांधकामांवर कारवाई असो, महसूल वाढीसाठी घेतलेले कठोर निर्णय असोत किंवा प्रशासनातील शिस्तीबाबतची भूमिका असो, मुंढे यांनी नेहमी लोकप्रियतेपेक्षा कर्तव्याला महत्त्व दिले.

अन्न व औषध प्रशासन विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन आयुष्याशी संबंधित प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. दूध, फळे आणि भाजीपाल्यातील भेसळ, बनावट आणि निकृष्ट दर्जाची औषधे, अमली पदार्थांचे जाळे, ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या जाहिराती आणि रुग्णालयांमधील आर्थिक शोषण यावर त्यांनी थेट कारवाई सुरू केली. अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेले विषय त्यांनी प्रशासनाच्या केंद्रस्थानी आणले.

विशेषतः रुग्णालयांमध्ये रुग्णांना संबंधित हॉस्पिटलच्या मेडिकलमधूनच औषधे घेण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारींवर त्यांनी घेतलेली भूमिका महत्त्वाची ठरली. औषध कुठून खरेदी करायचे हा रुग्णाचा अधिकार आहे, असे स्पष्ट सांगत त्यांनी रुग्णालयांच्या एकाधिकारशाहीला आव्हान दिले. या निर्णयामुळे लाखो रुग्णांना दिलासा मिळाला. याशिवाय, ग्राहकांची दिशाभूल करणाऱ्या जाहिराती आणि उत्पादनांवरील दाव्यांविरोधातही त्यांनी कठोर पावले उचलली. काही मोठ्या उद्योग समूहांवर कारवाई करण्याचे धाडस दाखवल्यामुळे त्यांची प्रतिमा आणखी मजबूत झाली.

**विशेष संपादकीय**
**करण नवले**
**संपादक**

याच कारणामुळे तुकाराम मुंढे यांना सर्वसामान्य नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळताना दिसत आहे. सोशल मीडियावर त्यांच्या समर्थनार्थ मोहिमा चालवल्या जात आहेत. त्यांच्या संभाव्य बदलीबाबत चर्चा सुरू होताच अनेक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. एका अधिकाऱ्याच्या बदलीची चर्चा जनआंदोलनाचा विषय ठरते, ही बाबच त्यांच्या कामाची पोचपावती मानावी लागेल.

खरे तर हा प्रश्न केवळ तुकाराम मुंढे यांच्यापुरता मर्यादित नाही. प्रश्न आहे तो प्रशासनाच्या कार्यपद्धतीचा. एखादा अधिकारी नियमांनुसार काम करू लागला, भ्रष्टाचाराला आळा घालू लागला आणि कोणत्याही राजकीय किंवा आर्थिक दबावाला बळी पडला नाही, तर व्यवस्था बदलू शकते हे मुंढे यांनी दाखवून दिले आहे. मग प्रशासनातील इतर अधिकारी अशा पद्धतीने का काम करत नाहीत, हा प्रश्न उपस्थित होतो.

अर्थात, प्रत्येक अधिकारी तुकाराम मुंढे होऊ शकत नाही. प्रत्येकाची कार्यशैली वेगळी असते. मात्र प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठा ही मूल्ये कोणत्याही अधिकाऱ्याला स्वीकारता येतात. प्रशासनातील अनेक समस्या या कायद्यांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या नाहीत; त्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जेव्हा एखादा अधिकारी नियमांचा वापर जनहितासाठी करतो, तेव्हा त्याचे परिणाम तात्काळ दिसू लागतात.

आज देशासमोर भ्रष्टाचार, भेसळ, आरोग्य क्षेत्रातील गैरप्रकार आणि ग्राहकांची फसवणूक यांसारखी मोठी आव्हाने आहेत. या समस्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी केवळ नवीन कायदे पुरेसे नाहीत. अशा अधिकाऱ्यांना राजकीय हस्तक्षेपापासून संरक्षण मिळाले आणि त्यांना स्वायत्तपणे काम करण्याची संधी मिळाली, तर प्रशासनावरचा लोकांचा विश्वास अधिक दृढ होईल. तुकाराम मुंढे हे एका व्यक्तीचे नाव नाही; ते प्रशासनातील उत्तरदायित्व, धाडस आणि जनहिताच्या भूमिकेचे प्रतीक बनले आहेत. म्हणूनच आजचा खरा प्रश्न तुकाराम मुंढे यांची बदली होणार की नाही हा नसून, तुकाराम मुंढे यांच्यासारखे आणखी किती अधिकारी निर्माण होणार हा आहे.

# पानोडी ग्रामपंचायतीवर 'महिला राज'; ११ पैकी ६ जागा महिलांसाठी आरक्षित!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**आश्वी :** संगमनेर तालुक्यातील पानोडी ग्रामपंचायतीच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीसाठी नुकतीच आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. या नव्या आरक्षणानुसार, सरपंचपदासह एकूण ११ सदस्यांच्या सभागृहात ६ महिला सदस्य असणार आहेत. यामुळे आगामी काळात पानोडी ग्रामपंचायतीवर खऱ्या अर्थाने 'महिला राज' येणार असल्याचे आता निश्चित झाले असून, ग्रामस्थांमध्ये या निर्णयाची मोठी चर्चा रंगली आहे.

गुरुवारी सकाळी गावातील हनुमान मंदिर प्रांगणामध्ये आरक्षण सोडतीसाठी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला काही ग्रामस्थांनी आरक्षण सोडतीच्या प्रक्रियेला विरोध दर्शवला, मात्र निवडणूक निर्णय अधिकारी आणि उपस्थित मान्यवरांनी सखोल चर्चा करून ग्रामस्थांचे समाधान केले. त्यानंतर अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात चिठ्ठ्या टाकून ही प्रक्रिया पार पडली.

या आरक्षण सोडतीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून विस्तार अधिकारी मदन शेवाळे यांनी काम पाहिले. त्यांना तलाठी अनिकेत मंडलिक आणि ग्रामसेवक सुरेंद्र ब्राम्हणे यांनी सहकार्य केले. पारदर्शक पद्धतीने चिठ्ठ्या काढून प्रभागांमधील आरक्षण निश्चित करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने प्रभाग १, ३ आणि ४ मधील सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी चिठ्ठ्या काढण्यात आल्या, तर प्रभाग २ मध्ये अनुसूचित जातीच्या महिलेसाठी आरक्षण निश्चित झाले.

**प्रभाग क्र. १:** नागरिक मागास प्रवर्ग (स्त्री), सर्वसाधारण (स्त्री), सर्वसाधारण.
**प्रभाग क्र. २:** अनुसूचित जाती (स्त्री), अनुसूचित जमाती (स्त्री).
**प्रभाग क्र. ३:** सर्वसाधारण (स्त्री), सर्वसाधारण (स्त्री), सर्वसाधारण.
**प्रभाग क्र. ४:** नागरिक मागास प्रवर्ग (सर्वसाधारण), सर्वसाधारण, सर्वसाधारण.

यावेळी विद्यमान सरपंच गणपत हजारे, दूध संघाचे संचालक विक्रम थोरात, माजी उपसरपंच अशोक तळेकर, नानासाहेब शिंदे, सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब घुगे, रामनाथ पवार, जालिंदर तळेकर, भारत शेवाळे, नानासाहेब कदम, संतोष चव्हाण, दत्तात्रय चव्हाण, दिपक जाधव, बाळासाहेब जाधव यांच्यासह गावातील तरुण कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# चनेगाव ग्रामपंचायत निवडणुकीची रंगत वाढली ; आरक्षण सोडत जाहीर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**सोनगाव :** आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चनेगाव ग्रामपंचायतीची वार्डनिहाय आरक्षण सोडत प्रक्रिया शुक्रवार (दि. १२) पंचायत समिती संगमनेर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विशेष ग्रामसभेच्या माध्यमातून झालेल्या या सोडत कार्यक्रमात तीन वार्डांतील नऊ सदस्य पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती संगमनेरचे विस्तार अधिकारी श्री. कासार आर. एम., कामगार तलाठी श्रीमती अनुपमा गांगुर्डे, ग्रामसेविका श्रीमती पठारे मॅडम, ग्रामपंचायत कर्मचारी गणेश पाटोळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन २०११ च्या जनगणनेनुसार चनेगावची लोकसंख्या २५६२ असून गावात सुमारे १६०० ते १७०० मतदार आहेत. ग्रामपंचायतीचे तीन वार्ड असून प्रत्येक वार्डात तीन सदस्य याप्रमाणे एकूण नऊ सदस्य ग्रामपंचायतीत निवडले जाणार आहेत.

**वार्ड क्र. १:** सर्वसाधारण महिला,सर्वसाधारण महिला,सर्वसाधारण पुरुष
**वार्ड क्र. २:** अनुसूचित जाती पुरुष,नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला,सर्वसाधारण पुरुष
**वार्ड क्र. ३:** अनुसूचित जाती महिला,अनुसूचित जमाती महिला, सर्वसाधारण पुरुष तसेच सरपंच पद

अनुसूचित जमाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने नऊ सदस्यांसह सरपंच मिळून एकूण दहा सदस्य ग्रामपंचायतीचा कारभार पाहणार आहेत. संपूर्ण सोडत प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी मच्छिंद्र पाटील पावडे, भास्कर पाटोळे सर, दत्तात्रय लोहाळे, अमोल खेमनार, इंद्रभान ढमक, राहुल पाटोळे, अण्णासाहेब गुळवे, शरद पाटोळे, अरुण ढमक, संजय बर्डे, गणेश पवार, राजेंद्र खेमनार, राजेंद्र गिरी, बाबासाहेब लोहाळे शहाजी खेमनर,यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. आरक्षण सोडतीनंतर आता चनेगावच्या राजकीय हालचालींना वेग आला असून इच्छुक उमेदवारांच्या तयारीला सुरुवात झाली आहे.

# श्री स्वामी समर्थ पालखीचे सोमवारी आगमन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पालखी व पादुका परिक'माचे सोमवार, दि. १५ जून रोजी श्रीरामपूर नगरीमध्ये भव्य आगमन होणार असल्याची माहिती श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट व स्वामी भक्त परिवाराने दिला आहे.

सालाबादप्रमाणे या २८ व्या वर्षीही श्री स्वामी समर्थ ट्रस्ट अक्कलकोट या संस्थानने पादुका व पालखी परिक्रमाचे आयोजन केले आहे. पालखीचे श्रीरामपूर नगरीमध्ये सोमवार, दि. १५ जून रोजी भव्य आगमन झाल्यानंतर दुपारी १२ ते ३ या वेळेत श्रीरामपूर मर्चंटस् असोसिएशनच्या व्यापारी मंगल कार्यालयात दुपारी १२ ते ३ धार्मिक कार्यक'म व महाआरतीचा सोहळा होणार आहे. पालखी दुपारी ४ वा. वैजापूरकडे रवाना होणार आहे. पालखी पादुका परिक'मा स्वागतासाठी व त्यानंतर होणार्या धार्मिक सोहळा, महाआरती व महाप्रसाद आदी कार्यक'मात स्वामी भक्त व भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजक श्री स्वामी समर्थ ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

# पर्यावरण मंडळाच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. अनिल लोखंडे यांचा सत्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** जागतिक पर्यावरण दिन आणि स्व. वृक्षमित्र आबासाहेब मोरे स्मृतीदिनानिमित्त राळेगणसिद्धी येथे आयोजित कार्यक्रमात निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ, महाराष्ट्र राज्य यांच्या उपाध्यक्षपदी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. अनिल लोखंडे यांची नियुक्ती करण्यात आली. पद्मभूषण समाजसेवक डॉ. अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे व सचिव वनश्री मोरे यांनी त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड होत्या. यावेळी विशेष सरकारी वकील सुरेश लगड, सेवानिवृत्त वनाधिकारी प्रभाकर म्हस्के, कार्याध्यक्षा छायाताई राजपूत यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या विविध विद्यालयांमध्ये शिक्षक ते मुख्याध्यापक पदापर्यंत प्रामाणिक सेवा बजावून सेवानिवृत्त झाल्याबद्दल डॉ. लोखंडे व आशाताई लोखंडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. गेल्या १५ वर्षांपासून डॉ. लोखंडे यांनी संस्थेच्या पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, सामाजिक प्रबोधन तसेच मूठभर चारा व घोटभर पाणी यांसारख्या उपक्रमांत सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या निवडीबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# शिर्डीच्या वॉटर पार्क मध्ये साई भक्ताचे सोने गहाळ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** हरियाणा राज्यातील साई भक्त शिर्डी येथे साई बाबाच्या दर्शनासाठी आले असता वॉटर पार्क मधे पोहण्याचा छंद त्यांच्या चांगलाच अंगलट आला. जवळील दहा तोळे सोने गहाळ झाल्याने त्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला आहे.

हरियाणा राज्यातील संदीप शेटीया हे साई बाबा चे भक्त असून ते नित्य नेमाने शिर्डीस साई दर्शनासाठी हजेरी लावत असतात. याही वेळी ते दि ११ जून रोजी आपल्या कुटूंबासमवेत शिर्डीत दाखल झाले.

त्यांनी ना. राधाकृष्ण विखे यांच्या शिर्डी संपर्क कार्यालयामार्फत दर्शन पास घेत दर्शन घेतले.

त्यानंतर कुटूंबियांच्या आग्रहाखातर दर्शनानंतर शिर्डी येथील वेट अँन्ड जॉय वॉटर पार्कमधे दुपारी सव्वा दोनच्या सुमारास प्रवेश केला. त्यांनी आपले कपडे लॉकर मधे ठेवून पत्नी मिनाक्षी, मुले विहान व राघव व स्वतः च्या अंगावर असणारे सोन्याचे दागिने एका पर्स खिशात ठेवून रायडींग मधे पाण्यात खेळण्यास सुरुवात केली. पहिल्याच रायडींगनंतर त्यांनी आपल्या खिशातील सोने चेक केले असतात सोने ठेवलेली पर्स खिशात नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्वरीत तेथील प्रशासनाच्या लक्षात हा प्रकार आणून दिला व शोध मोहीम सुरू झाली. सिसीटीव्ही चेक करून ही त्याचा काही फायदा झाला नाही. अखेर त्यांनी शिर्डी पोलीस ठाणे गाठत पो. नि. गलांडे यांच्या कानावर सदर प्रकार घातला. त्यांनी पार्कच्या प्रशासनाशी संपर्क साधून विचारणा केली असता दुसऱ्या दिवशी सकाळी पार्क सुरू होण्यापूर्वी पाण्याच्या तळाशी शोध घेवू असे सांगितले. सदर भक्त सकाळी सात वाजता पार्कमधे दाखल होवून पाण्याच्या तळाशी शोध घेतला. परंतु तेथे त्या सोने असलेल्या पर्स चा शोध लागला नाही.

**भक्तांच्या सुरक्षिततेला प्राधान्य : बजाज**

आमचे कडे येणाऱ्या प्रत्येक साई भक्त सुरक्षित रहावा म्हणून वॉटर पार्क प्रशासन स्वतः काळजी घेत असते. भक्तांच्या मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी विनामूल्य लॉकरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच स्पिकर अनाउन्समेंट द्वारे चोरांपासून सावधान तसेच आपल्या मौल्यवान वस्तूची जबाबदारी स्वतः ने घ्यावी असा मेसेज वारंवार दिला जातो. सदर भक्तांच्या गहाळ झालेल्या मौल्यवान वस्तू तिथे गहाळ झाल्या तेथे पुर्ण पणे चौकशी केली. यापुढे ही भक्तांनी स्वतः च्या मौल्यवान वस्तू ची स्वतः काळजी घ्यावी यास प्रशासन जबाबदार राहणार नसल्याचे येथील व्यवस्थापक अनुप बजाजी व संदीप सदाफळ यांनी सांगितले.

# खांबळी पाझर तलावातील पाणी व वीज चोरीप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** खांबळी पाझर तलावातील कथित पाणी चोरी व वीज चोरीप्रकरणी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागांकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप करत पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनोखे आंदोलन करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना प्रतीकात्मक स्वरूपात 'राष्ट्रीय भ्रष्टोबा' घोषित करून त्यांच्या निषेधार्थ दोन दगडांना शेंडी-शेंदूर लावण्यात आला. तसेच त्यांच्या डोक्यात प्रकाश पडावा आणि जनतेच्या समस्या समजाव्यात यासाठी संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाचे प्रतिकात्मक प्रतिमा अर्पण करण्यात आले.

या आंदोलनात ड. कारभारी गवळी, प्रकाश थोरात, अशोक सब्बन, रवी सातपुते, शंकर साळवे, तुकाराम बोरगे, पोपट भोसले, शाहीर कान्हू सुंबे, ड. अमित थोरात, बाळासाहेब पालवे, वीरबहादूर प्रजापती, वाय. के. शेख यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मौजे पळशी (ता. पारनेर) येथील खांबळी पाझर तलावासाठी महाराष्ट्र शासनाने १९८६ साली जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यानंतर तलावाचे काम सुरू होऊन १९९० मध्ये तलाव पूर्णत्वास गेला. मात्र, तलाव परिसरातील काही व्यक्तींनी शासनाची परवानगी न घेता तलावाच्या हद्दीत बेकायदेशीरपणे विहिरी खोदल्या असल्याचा आरोप करण्यात आला. तसेच वीज वितरण कंपनीची अधिकृत परवानगी न घेता बेकायदेशीर वीजजोडणी करून किंवा आकडे टाकून विजेच्या मोटारी चालविण्यात येत असल्याचा गंभीर आरोपही आंदोलकांनी केला. या मागणीचे निवेदन मृदा व जलसंधारण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आंदोलन स्थळी येऊन स्विकारले.

# कोल्हार येथे काल्याच्या कीर्तनाने ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



(छाया : गणेश कुंभकर्ण )

**कोल्हार :** जिथे हरिनाम घेतले जाते, प्रेम आणि एकता नांदते, तिथे परमेश्वराचा वास असतो. 'काला' म्हणजे समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचा संदेश असून तो ऐक्याचे प्रतीक आहे. अधिक मास अर्थात पुरुषोत्तम मासामध्ये केलेले नामजप, तप व दान यांमुळे पुण्याची फलप्राप्ती होते, असे प्रतिपादन लोणी येथील वरद विनायक सेवाधामचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.

कोल्हार भगवतीपूर येथे अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्त ग्रामदैवत भगवती माता मंदिरात आयोजित ज्ञानेश्वर पारायण सोहळ्याची सांगता शुक्रवारी महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी रघुनाथ खर्डे, उपाध्यक्ष साहेबराव दळे, डॉ. भास्करराव खर्डे, सुरेंद्र खर्डे, विश्वस्त नानासाहेब कडसकर, लक्ष्मण खर्डे, वसंत नानासाहेब खर्डे, अजित मोरे, सुजित राऊत, जनार्दन खर्डे, संभाजी देवकर, रावसाहेब कमळाजी खर्डे, संपत कापसे,नितीन कुंकूलोळ, विजय निबे तसेच पारायण सोहळ्याचे व्यासपीठ चालक ह.भ.प. विजय महाराज कुहिले, ह.भ.प. अनिल लोखंडे, ह.भ.प. नामदेव महाराज क्षीरसागर, मधुकर खर्डे, विजय डेंगळे, ऋषिकेश खांदे, प्रवीण बेंद्रे, पत्रकार प्रमोद कुंभकर्ण, यांच्यासह कोल्हार भगवतीपूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महंत उद्धव महाराज मंडलिक यांचे सकाळी आगमन होताच महालक्ष्मी मंदिर ते भगवती माता मंदिरापर्यंत सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# छल्लारे फौंडेशनच्यावतीने बस सवलत कार्डचे वाटप



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील ऋषी छल्लारे फाउंडेशनच्या वतीने भोकर व परिसरातील गावातील विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिक यांना बस सवलत (एन.सी.एम.सी.) कार्डचे नुकतेच वाटप करण्यात आले. लोकनेते माजी आ. भानुदास मुरकुटे व युवा नेते नीरज मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली या फाउंडेशनचे कामकाज सुरू असून जवळजवळ १००० लाभार्थी यांना या कार्डचे वाटप करण्यात आले. या कामी ऋषी छल्लारे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बांधकाम कामगार नेते गणेश उर्फ किशोर छल्लारे यांनी लाभार्थी व्यक्तींना कार्ड काढून देणे कामी फाउंडेशनच्या मार्फत सहकार्य केले. याप्रसंगी लाभार्थींना कार्डचे वाटप करताना ऋषी छल्लारे फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश उर्फ किशोर छल्लारे , हरेगावचे माजी सरपंच दीपक नवगिरे, ओमकार छल्लारे, दिगंबर छल्लारे, बाळासाहेब मते, बाळासाहेब रूपटक्के, अनिल वाघुंबरे , कृष्णा केशर कर, अशोक थोरात, बाबुराव अमोलिक, राजेंद्र कांगुणे , सिताराम खराडे, शकुंतला चौधरी , मीना झुरंगे, इंदुबाई अमोलिक, मालनबाई राठोड आदींसह लाभार्थी वाटप प्रसंगी उपस्थित होते. त्याचप्रमाणे ऋषी छल्लारे फाउंडेशन मार्फत पी. एम किसान योजनेची इ केवायसी घेण्याचा लाभ ही शेतकरी बांधवांनी घ्यावा असे आवाहन गणेश छल्लारे यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय-कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक: करण बाबासाहेब नवल RNI No. MAHM-R/2019/82605 www.rashtrasahyadri.com owner publisher Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur, Dist., Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: Karan Babasaheb Nawale RNI No M-HM-R/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadrigmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

# राजहंस दूध संघात १३५० किलोवॅट सौरऊर्जा प्रकल्प सुरु

## दररोज ५,२५० युनिट वीज निर्मिती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघ (राजहंस दूध संघ) येथे १३५० किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ राज्याचे माजी कृषी व महसूलमंत्री तथा दूध संघाचे मार्गदर्शक बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाला. टाटा कंपनीच्या समन्वयातून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे दूध संघाच्या विजेवरील खर्चात मोठी बचत होणार असून पर्यावरण संवर्धनालाही हातभार लागणार आहे. यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, दूध हे महत्त्वाचे अन्न असून त्याची शुद्धता व गुणवत्ता जपल्यामुळे राजहंस दूध संघाने राज्यभरात वेगळी ओळख निर्माण केली आहे.



दूध संघाने उभारलेला सौरऊर्जा प्रकल्प हा दूरदृष्टीचा निर्णय असून यामुळे ऊर्जा खर्चात बचत होण्याबरोबरच संघ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल. पुढील तीन वर्षांत प्रकल्पावरील खर्चाची परतफेड झाल्यानंतर दीर्घकाळ संघाला मोफत वीज उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख होते. व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, लक्ष्मणराव कुटे, आर. बी. राहणे, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, व्हाइस चेअरमन राजेंद्र चकोर, ड. नानासाहेब शिंदे, कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी, कन्सल्टंट विनीत शहा यांच्यासह संचालक व पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार सत्यजित तांबे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, सौरऊर्जेचा हा प्रकल्प पुढील अडीच वर्षांत स्वतःचा खर्च वसूल करेल. विजेवरील खर्चात होणारी बचत थेट शेतकऱ्यांच्या हितासाठी उपयोगी पडणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पांना अधिक प्रोत्साहन मिळण्याची गरज आहे. चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी सांगितले की, सुमारे अडीच एकर क्षेत्रात उभारलेल्या या प्रकल्पातून दररोज सुमारे ५,२५० युनिट वीज निर्मिती होणार असून महिन्याला दीड लाख युनिट वीज उपलब्ध होईल. सर्व आवश्यक मंजुरींसह अवघ्या तीन महिन्यांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे. आगामी काळात दूध संकलन वाढविणे आणि दुधाच्या शुद्धतेवर अधिक भर देणे हे संघाचे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात विनीत शहा यांनी दूध उत्पादनातील स्वच्छता, गुणवत्ता व आधुनिक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. सुजित खिलारी यांनी केले, तर आभार राजेंद्र चकोर यांनी मानले. यावेळी दूध उत्पादक, दूध सेवा सोसायट्यांचे पदाधिकारी, चेअरमन, सचिव आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# द • ख • ल

### मेजर नंदकुमार सैंदोरे यांची पीएसआयपदी नियुक्ती



**शिरसगाव** : श्रीरामपूर येथील बोरावकेनगर मधील मेजर नंदकुमार संतराम सैंदोरे यांची केंद्रिय पोलीस दलामध्ये पोलीस सब इन्सपेक्टर म्हणून श्रीनगर येथे नियुक्ती झाली असून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मेजर नंदकुमार सैंदोरे हे भारतीय सैन्य दलातून सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी स्टाफ सिलेक्शन कमिशनमार्फत स्पर्धा परीक्षा देऊन, पुणे येथील कठीण प्रशिक्षणानंतर त्यांची पीएसआय पदी निवड झाली. राहुरी तालुक्यातील मांजरी गावचे सुपुत्र असलेले मेजर नंदकुमार सैंदोरे यांनी २००४ ते २०२० या काळात भारतीय आर्मीत कम्युनिकेशन अधिकारी म्हणून श्रीनगर, मथुरा, जबलपूर, मणिपूर आदी ठिकाणी आर्मी ऑफिसर होते. मेजर नंदकुमार सैंदोरे यांनी सेवानिवृत्ती नंतर बंधू रवींद्र सैंदोरे यांच्याबरोबर प्रभावी शेतीकाम केले. मांजरी ग्रामस्थ, शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, व्यक्तींनी त्यांचा सन्मान केला. तसेच बोरावकेनगर अक्षरवेलमधील श्रीराम अबॅकस क्लासमध्ये प्रमुख संचालक प्रा. पल्लवी नंदकुमार सैंदोरे व पालक, विद्यार्थ्यांनी मेजर नंदकुमार सैंदोरे यांचा यथोचित साकार केला. श्रीरामपूर येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये यांचे ते जावई असून त्यांचा वाचन संस्कृतीतर्फे सन्मान करण्यात आला. मेजर नंदकुमार सैंदोरे यांचे तुळे कुंभारकला केंद्राचे प्रमुख प्रा. विलासराव तुळे, श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठानचे सचिव नितीन जोर्वेकर, महानुभाव पंथ मंचचे साधक संजय कारभारी उपाध्ये आदिंनी त्यांचे अभिनंदन, सत्कार केले.

### शिरसगावची अवंतिका गवारे डॉ.सी.व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत राज्यात दुसरी



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील स्व. सौ. एस. के. सोमय्या विद्यालयाची विद्यार्थिनी अवंतिका किशोर गवारे हिने डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या सन २०२६-२७ च्या निकालात अवंतिकाने ९४% गुण मिळवून तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात पाचवा आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यात द्वितीय (२ रा) क्रमांक पटकावला आहे. अवंतिकाने शाळेतील तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेत सहभाग घेतला होता. या परीक्षेत तिच्यासह विद्यालयातील इतरही अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय सुयश मिळवले आहे. अवंतिकाच्या या दैदिप्यमान यशामुळे तिचे व शाळेचे नाव परिसरात उज्ज्वल झाले आहे. या यशाबद्दल शाळेचे सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, शिरसगावचे ग्रामस्थ आणि मान्यवरांकडून अवंतिका गवारे हिचे भरभरून कौतुक व अभिनंदन होत आहे.

### बेलापूर ग्रामपंचायतची आरक्षण सोडत जाहीर

**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या बेलापूर ग्रामपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यपदांच्या आरक्षणाची सोडत काल उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.या निवडणूक करिता प्रभाग क्रमांक एक ते प्रभाग क्रमांक सहा मधील प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी काही ग्रामस्थांनी सोडतीस हरकती नोंदविल्या आहेत. परंतु,अध्यासी अधिकारी म्हणून मंडलाधिकारी पी.एस.ओहोळ यांच्या म्हणण्यानुसार, ज्या हरकती असतील,त्या माननीय तहसीलदाराकडे यांच्याकडे नोंदवाव्यात असे स्पष्ट सागितले. यावेळी प्रभाग (क्र.१ ) (क्र. ३ ) या वॉर्डामध्ये नाममात्र प्रवर्ग व्यक्ती,अनुसूचित जाती स्त्री, व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग (क्र.२ ) सर्वसाधारण व्यक्ती, सर्वसाधारण स्त्री, व सर्वसाधारण स्त्री, प्रभाग ( क्र.३ ), नाममात्र व्यक्ती, सर्वसाधारण स्त्री,अनुसूचित जाती स्त्री, प्रभाग (क्र. ४ ),दोनच सदस्य संख्या असून,त्यात अनुसूचित जाती व्यक्ती सर्वसाधारण स्त्री, प्रभाग (क्र.५) अनुसूचित जमाती व्यक्ती, सर्वसाधारण व्यक्ती, नाममात्र प्र. स्त्री, प्रभाग ( क्र.६ ),तीन सदस्य असून, त्यात सर्वसाधारण व्यक्ती, नाममात्र प्रवर्ग स्त्री, सर्वसाधारण स्त्री,अशा पद्धतीने १७ जागेकरिता आरक्षण जाहीर करण्यात आले.यात, १७ जागेत ९ जागा महिलांकरिता राखीव ठेवण्यात आलेले आहेत.तर, ८ जागा पुरुषाकरिता आहेत.तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या आदेशानुसार आध्याशी अधिकारी म्हणून मंडलाधिकारी पी.एस ओहोळ यांनी काम पाहिले.सहाय्यक म्हणून बेलापूर ग्राम महसूल अधिकारी गणेश शिंदे व ग्रामपंचायत अधिकारी निलेश लहारे यांनी सहकार्य लाभले. याप्रसंगी, संजय गांधी निराधार समिती तालुकाध्यक्ष शरद नवले, जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, शिवाजी वाबळे, चंद्रकांत पाटील नाईक, मुस्ताक शेख, रफिक शेख, जिना शेख,अजिज शेख,भाऊसाहेब तेलोरे,महेश कुऱ्हे, विशाल आंबेकर, सुधीर तेलोरे,सचिन वाघ, सचिन अमोलिक,शफिक बागवान, जिना शेख आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.शेवटी अभिषेक खंडागळे यांनी आभार मानले.

## ना.विखे यांच्या वाढदिवसानिमित्त हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**फत्याबाद** : श्रीरामपूर तालुक्यातील फत्याबाद येथे महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना.डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने खुल्या हॉलीबॉल स्पर्धा २०२६ 'नामदार गौरव चषक' स्पर्धेचे आयोजन १४ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता प्रवरा विद्यानिकेतन व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आले आहेत. यादरम्यान महाराष्ट्रातील नामवंत संघ यात सहभागी होणारा असून ५१००० हजार रुपयाची विविध बक्षिसे ठेवण्यात आलेली आहे.ही स्पर्धा प्रवरा विद्यानिकेतन महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर आयोजित केली आहेत.या स्पर्धेचे आयोजन श्रीरामपूर तालुका भाजपाचे उपाध्यक्ष पांडुरंग आठरे यांच्यासह सर्वच खेळाडू क्रीडाप्रेमी व पंचक्रोशीतील नागरिकांनी स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी आवर्जुन उपस्थित राहावे आवाहन गणेश आठरे, सागर त्रिभुवन, असिफ इनामदार, मुस्ताक पटेल, क्रीडा शिक्षक संदिप निबे यांनी केले.

## प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संशोधनाला पेटंट

### रुई वनस्पतीवर आधारित मधुमेह व खोकल्यावरील हर्बल संयुगाला मान्यता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याला आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. संस्थेच्या पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, लोणी आणि प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी, लोणी येथील संशोधकांनी विकसित केलेल्या रुई या औषधी वनस्पतीवर आधारित हर्बल संयुगाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट क्रमांक ५९१७०१ मंजूर करण्यात आला आहे.

या संशोधनामध्ये रुई या औषधी वनस्पतीच्या गुणधर्मांचा उपयोग करून मधुमेह नियंत्रणास तसेच खोकल्यावरील उपचारांसाठी उपयुक्त ठरणारे परिणामकारक हर्बल संयुग विकसित करण्यात आले आहे. नैसर्गिक औषधी वनस्पतींवर आधारित संशोधनाला प्रोत्साहन देणाऱ्या या कार्यामुळे आरोग्य क्षेत्रात पर्यायी उपचार पद्धती विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले आहे.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेची संशोधन परंपरा अधिक समृद्ध करणाऱ्या या यशामुळे संस्थेतील पीएच.डी. विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या संशोधन क्षमतेची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. भविष्यात औषधनिर्मिती, आरोग्य सेवा आणि उद्योग क्षेत्रात या संशोधनाचा व्यापक उपयोग होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या संशोधनासाठी प्रेरणा धनंजय जाधव, डॉ. महेश निवृत्ती खर्डे, डॉ. अनिल सोपानराव वाबळे आणि डॉ. संतोष भाऊसाहेब दिघे यांना सहसंशोधक म्हणून पेटंटमध्ये मान्यता देण्यात आली आहे. यापैकी डॉ. संतोष दिघे हे प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी, लोणी येथील प्राध्यापक असून डॉ. महेश खर्डे व डॉ. अनिल वाबळे हे पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, प्रवरानगर येथे कार्यरत आहेत.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, संस्थेचे सचिव भारत घोगरे तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संशोधकांचे अभिनंदन करून पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## आरोग्य, शिक्षण व समाजसेवेत उल्लेखनीय योगदान

### डॉ. प्रकाश पवार यांना 'अटल भारत गौरव सन्मान २०२६'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : आरोग्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात गेली अनेक वर्षे निस्वार्थ भावनेने कार्य करणारे राहुरी येथील सुप्रसिद्ध वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. प्रकाश रावसाहेब पवार यांना नवी दिल्ली येथे आयोजित भव्य समारंभात 'अटल भारत गौरव सन्मान २०२६' या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. अवॉर्ड्स ट्रस्ट ऑफ इंडियाच्या वतीने ६ जून २०२६ रोजी देशभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. पवार यांनी गेल्या १५ वर्षांपासून वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांनी दिवस-रात्र आपत्कालीन सेवा, आरोग्य जनजागृती आणि गरजूंना मदतीचे कार्य सातत्याने सुरू ठेवले आहे. वैद्यकीय व्यवसायाला केवळ उपजीविकेचे साधन न मानता समाजसेवेचे माध्यम म्हणून त्यांनी जपले आहे. रुग्णांच्या सेवेसाठी सण-उत्सव, वैयक्तिक आनंदाचे क्षण आणि विश्रांतीचा वेळ यांचा त्याग करत त्यांनी हजारो रुग्णांना आरोग्य लाभ मिळवून



दिला आहे. अनेक संकटांच्या प्रसंगी धावून जात रुग्णांना दिलासा देण्याचे कार्य त्यांनी अविरतपणे केले आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील मानसिक व भावनिक आव्हानांना समर्थपणे सामोरे जात त्यांनी सेवाभावाची परंपरा कायम राखली आहे. डॉ. पवार यांचे कार्य केवळ दवाखान्यापुरते मर्यादित नसून सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या पुढाकारातून नियमित रक्तदान शिबिरे, महिलांसाठी कर्करोग जनजागृती व समुपदेशन शिबिरे, शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी तसेच गरजूंना मोफत औषध वाटप यांसारखे उपक्रम सातत्याने आयोजित केले जातात.

शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या उद्देशाने मराठी माध्यमातील सेमी-इंग्रजी शाळेची स्थापना केली. नर्सरी ते दहावीपर्यंतच्या या शाळेत सध्या सुमारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असताना त्यांच्या विविध उपक्रमांमुळे आणि संस्थांमधून सुमारे ६० ते ७० कुटुंबांना रोजगाराचा आधार मिळाला आहे. त्यामुळे समाजातील अनेक कुटुंबांच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागला आहे.

## जिल्हा सत्र न्यायालयाने शरद खंडू पवार यांचा जामीन अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहील्यानगर** : किशोर महादेव परभणे यांना अमानूष मारहाण केल्याच्या कारणामुळे न्यायालयीन कोठडीत असलेले खासदार निलेश लंके यांचे कट्टर समर्थक चिंचोडी पाटीलचे सरपंच शरद खंडू पवार याचा जामिन अर्ज जिल्हा सत्र न्यायालयाने आज फेटाळला आहे. सोशल मिडीयावर व्हीडीओ पोस्ट केल्याचे कारणाने किशोर महादेव परभणे यांचे अपहरण करुन, त्यांना खोलीत डांबून ठेवत अमानुष मारहाण केल्याची घटना घडली होती. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रणव विजय मोरे, शदर खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे यांच्यावर ४ मे २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्याबाबत सोशल मिडीयावर व्हीडीओ पोष्ट केल्याच्या रागातून अपहरण आणि मारहाणीची घटना घडली होती.

या घटने संदर्भात पोलिसांनी शरद खंडू पवार यास अटक केली होती. अहिल्यानगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी श्री एस आर शिंदे यांच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती. पवार हा कोठडीत असताना तपासी अधिका-यांना उडवा उडवीचे उत्तर देत समाधानकारक माहीती न दिल्याने पोलिसांनी त्यास पुन्हा न्यायालयात हजर केले होते.न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली. जामीन मिळावा म्हणून, शरद खंडू पवार याने न्यायालयात प्रयत्न यापुर्वी केले होते.

याबाबतची सुनावणी शुक्रवारी पुन्हा जिल्हा सत्र न्यायालयाचे न्यायाधीश राजेश गुप्ता यांच्यासमोर झाली. मूळ फिर्यादीच्या वतीने ॲड.आनंद व्यवहारे यांनी बाजू मांडली तर, सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त सरकारी वकील अनिल ढगे यांनी बाजू मांडून शरद पवार यांच्या जामीण अर्जास विरोध केला. न्यायालयाने दोन्हीही बाजूचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर शरद खंडू पवार याचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

## आ. तनपुरे यांच्या बिनविरोध निवडीबद्दल पतसंस्था मल्टीस्टेट चळवळीच्यावतीने सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : अहिल्यानगर विधानपरिषद निवडणुकीत आमदार प्राजक्त तनपुरे यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल पतसंस्था व मल्टिस्टेट चळवळीच्यावतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रेरणा उद्योग समूहाचे अध्यक्ष सुरेश वाबळे आणि साई आदर्श मल्टिस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. पतसंस्था आणि मल्टिस्टेट सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक बळकटी देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. बचत, कर्जपुरवठा, स्वयंरोजगार, लघुउद्योगांना आर्थिक सहाय्य तसेच आर्थिक समावेशनासाठी या संस्थांची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. या चळवळीच्या बळकटीसाठी आणि सहकार क्षेत्रातील प्रश्न शासन स्तरावर प्रभावीपणे मांडण्यासाठी कटिबद्ध राहू असे आ. प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले.

निशाणी नंबर : ०८
नेमलेली तारीख : १७/०७/२०२६

### जाहीर नोटीस

ॲड. के. जी. पिसाळ
नेवासा कोर्ट

नेवासा येथील मे. जिल्हा न्यायाधीश-१ साहेब यांचे न्यायालयात
दिवाणी चौकशी अर्ज नं.३०/२०२६

अर्जदार :
१. सुजाता सदाशिव वाघ वय - ४४ वर्ष, धंदा शेती,
२. सदाशिव रामदास वाघ वय - ५० वर्ष, धंदा शेती
३. जयदीप सदाशिव वाघ वय १६ वर्ष, धंदा - शिक्षण अ.पा.क. सुजाता सदाशिव वाघ रा. सोनई, ता. नेवासा, जि. अ.नगर

वरील अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अज्ञानाचे नावावरील मौजे सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथील शेतजमीन मिळकत गट नं. १८ पैकी क्षेत्र ०.४० पो. ख. ०.०२ हे. आर आणि गट नंबर ३३१ पैकी क्षेत्र ०.६१ हे. आर. वर शेतीचे सुधारणा करणेसाठी बँक कर्ज घेण्यास परवानगी मिळणेकामी दिवाणी चौकशी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही म्हणणे असेल किंवा कुणाची काही हरकत असेल तर या सायटेशन नोटीस प्रसिध्द तारखेपासुन एक महिन्याचे आत अथवा दि.१७/०७/२०२६ रोजी या न्यायालयात स्वतः अगर वकीलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्यानिशी सायटेशन
नोटीस दिली असे.

**तयार करणार**
**वरिष्ठ लिपीक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**

**हुकूमावरुन**
**अधिक्षिक जिल्हा न्यायालय, नेवासा**

## खा. वाकचौरे यांचा पक्ष प्रवेश तळ्यात मळ्यात, सस्पेन्स कायम

**अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री**







**शिर्डी** : शिर्डीचे खा. भाऊसाहेब वाकचौरे शिंदे सेनेच्या वाटेवर अशा चर्चाना उधाण आले असतानाच संसदीय समिती सोबत पंजाबच्या अभ्यास दौऱ्यावरून परतल्या नंतर तो मी नव्हेच अशी भूमिका वाकचौरे नी घेतल्या मुळे त्याचा शिंदे सेना प्रवेश तळयात मळ्यात असल्याचे दिसून येत असताना सस्पेन्स मात्र कायम आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर'ची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर 'तुम्हीच मला तिकडे ढकलण्याचा प्रयत्न करत आहात का?' असा उलट प्रश्न विचारून स्वतः ला गोंधळात टाकल्याचे दिसून येत आहे . मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आजिबात भेटलो नाही तुम्ही करता त्या चर्चा बिनबुडाच्या असल्याचे सांगत मूळ मुद्दयापासून लक्ष हटवण्या दायल. गेल्या काही दिवसांपासून राजकीय गोटात 'ऑपरेशन टायगर 'बद्दल उलटसुलट चर्चा सुरू आहेत. यावर प्रतिक्रिया देताना खासदार वाकचौरे म्हणाले की, 'मला 'ऑपरेशन टायगर' या विषयाची कोणतीही माहिती नाही. मी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटलेलो नाही आणि इतर कोणते खासदार गेले होते, याचीही मला कल्पना नाही. अशा चर्चाना काहीही अर्थ नाही.' मतदारसंघातील विकासकामांसाठी मी प्रयत्नशील असून त्यांनी हे वृत्त फेटाळून लावले. 'मी तुमचे पुढे हात जोडतो, मला पक्ष प्रवेशावर काहीही विचारू नका,' असे म्हणत मूळ प्रश्नाला बगल देत यावर चर्चा करू नका सस्पेन्स कायम ठेवला आहे.

शिवसेना नेते मा खा. चंद्रकांत खैरे यांनी वाकचौरे ना कुणी थांबवू शकत नाही या वक्तव्यावर खा वाकचौरे यांनी सावध पवित्रा घेत 'चंद्रकांत खैरे माझ्याबद्दल नेमके काय बोलले आहेत, हे त्यांनाच विचारा,' असे सांगत त्यांनी अधिक भाष्य करणे टाळले. शिर्डीतील मेळाव्यावेळी आपण संसदेच्या संसदीय समितीसोबत पंजाबच्या अभ्यास दौऱ्यावर होतो असे बोलून त्यांनी ऑपरेशन टायगर पासून सध्या तरी दूर राहणे पसंत केले आहे .

### वाकचौरे ना मोदींचे नेतृत्व मान्य!

आज प्रत्येक जण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नेतृत्व मान्य करत आहे . पश्चिम बंगालमधील २० खासदार यांनी एनडीए मध्ये प्रवेश केला आहे ज्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व मानले ते प्रवेश करत आहे. त्याप्रमाणे भाऊसाहेब वाकचौरे नरेंद्र मोदी यांचं नेतृत्व माणून शिवसेनेत आल्यास त्यांचं स्वागत असल्याचे मा खा डॉ सुजय विखे यांनी वक्तव्य केल्याने वाकचौरे चा उशीरा का होईना सेना प्रवेश होईल असा अप्रत्यक्ष विश्वास व्यक्त केला आहे.

### जहीर नोटीस

ज्याअर्थी अर्जदार श्रीमती मनिषा तुपे यांचे पती व नितेश व नंदीपी तुपे पिता संजय निवृत्ती तुपे हे महावितरण कंपनीमध्ये हरेगांव सब स्टेशन येथे लाईनमन या पदावर कायमस्वरुपी नोकरीस होते व संजय तुपे हे कर्तव्यावर असतांना दिनांक २१/२/२०२६ रोजी मयत झालेले आहेत व अर्जदार हे मयत संजय निवृत्ती तुपे यांचे एकमेव कायदेशिर वारस आहेत.

वर नमुद अर्जदार, हे मयत संजय निवृत्ती तुपे यांचे कायदेशिर वारस आहेत असे मे. कोर्टाचे वारसप्रमाणपत्र-हिअरशिप सर्टिफिकेट अर्जदार यांना अनेक शासकीय कामासाठी आवश्यक व गरजेचे आहे.

सबब वर नमुद अर्जदार हे मयत संजय निवृत्ती तुपे यांचे कायदेशिर वारस आहे असे वारस प्रमाणपत्र अर्जदारांना मिळावे करीता अर्जदार या कार्यालयात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे.कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदारांचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

**तहसिलदार श्रीरामपूर**

**महसुल विभाग**
**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी श्रीरामपूर**
**यांचे कार्यालय श्रीरामपूर**
क्रमांक/कावि/दंडव्य/हस्ते/२०२६
श्रीरामपूर दि.२४/०२/२०२६

### जाहीर प्रगटन

ज्याअर्थी श्री श्रीम. संजय रामदास उडे रा. उंबरगांव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर यांचे कडील दिनांक १८/०९/२०२५ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की अर्जदार यांचे वडील नामे रामदास मारुती उंडे यांचा मृत्यु दिनांक १८/०८/२०२४ रोजी राहते घरी उंबरगांव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर येथे मयत झालेला आहे. सदर अर्जदारचे वडीलांचे मृत्युची नोंद त्यांना जन्म मृत्यु कार्यालयात मिळुन आलेली नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे वडीलांचे मृत्युची नोंद सरकारी दप्तरी लावायची आहे. यासाठी त्यांनी दिनांक १८/०९/२०२५ रोजी अर्ज दिले आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटना व्दारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की, वरील मृत्युचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या
तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला
निर्गमित करण्यात येईल.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार श्रीरामपूर करीता**

## पान १ वरुन

### महिला शेतकऱ्यांना मिळणार वैधानिक 'शेतकरी' दर्जा

यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. तसेच महिला शेतकऱ्यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या सर्व बाबींचा समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सौम्या स्वामीनाथन, वरिष्ठ अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

### शेअर बाजारातील नुकसानीने कुटुंब उद्ध्वस्त!

नुकसानीचा उल्लेख करण्यात आला आहे. प्राथमिक माहितीनुसार, शेअर बाजारातील व्यवहारांमुळे त्यांच्यावर सुमारे १ कोटी ८० लाख रुपयांचे कर्ज झाले होते. वाढत्या आर्थिक तणावामुळे ते मानसिकदृष्ट्या खचले होते, अशी माहिती तपासातून समोर येत आहे. योगेश पाटील काही दिवसांपूर्वी कुटुंबासह गावी आले होते. त्यानंतर ही घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या सर्व बाबींचा तपास केला जात असून सुसाईड नोटचीही सखोल छाननी करण्यात येत आहे. पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची नोंद करण्यात आली असून सर्व बाजूंनी तपास सुरू आहे. शवविच्छेदन अहवाल आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील कारवाई केली जाणार आहे. या दुर्दैवी घटनेमुळे आर्थिक ताणतणाव, गुंतवणुकीतील जोखीम आणि मानसिक आरोग्य या विषयांवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे. एका सुशिक्षित कुटुंबाचा अशा प्रकारे अंत झाल्याने संपूर्ण बार्शी तालुका शोकमग्न झाला आहे.

### पंढरपुरात रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन सुरू

आचारसंहिता आणि पंढरपुरातील वाढती गर्दी लक्षात घेऊन आंदोलनाबाबत पुनर्विचार करण्याचे आवाहन केले होते. जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनासंदर्भात चर्चा करण्याची तयारीही दर्शविली होती. मात्र शेतकरी हितासाठी आंदोलन मागे घेण्याचा प्रश्नच उद्भवत नसल्याचे संकेत रोहित पवार यांनी दिले आहेत. या आंदोलनावरून राज्यातील राजकीय वातावरणही तापले आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी रोहित पवार यांच्या आंदोलनावर टीका करत हे त्यांच्या राजकीय अस्तित्वासाठीची धडपड असल्याचे म्हटले होते. त्यावर राष्ट्रवादीच्या नेत्यांनीही प्रत्युत्तर देत शेतकरी प्रश्नांवर सरकार गंभीर नसल्याचा आरोप केला आहे. लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांच्या आंदोलनाकडे केवळ शेतकरी प्रश्नांच्या दृष्टीनेच नव्हे तर राज्याच्या राजकारणातील महत्त्वाच्या घडामोडी म्हणूनही पाहिले जात आहे. सरकार या आंदोलनाची कितपत दखल घेते आणि शेतकरी कर्जमाफीबाबत कोणता निर्णय घेते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. सरकारच्यावतीने उपजिल्हाधिकारी सचिन इथापे, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कवाडे, डीवायएसपी प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगोटे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन त्यांनी कृषीमंत्री दत्तामामा भरणे आणि सहकारमंत्री बाबासाहेब पाटील साहेब यांच्याही फोनवर संपर्क घडवून आणला. यावेळी पुढील दोन-तीन दिवसांत बैठक घेण्याचं आश्वासन मंत्री महोदयांनी दिलं आणि यासंदर्भात त्यांची मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा झाल्याचंही सांगितलं, परंतु राज्याच्या कोणत्याही कॅबिनेट मंत्र्याने प्रसारमाध्यमांसमोर येऊन कर्जमाफीसाठीच्या जाचक अटी रद्द करण्याचं ठोस आश्वासन देण्याची मागणी यावेळी त्यांच्याकडं केली. कर्जमाफीचा निर्णय घेताना टाकलेल्या या अटीशर्तींमुळं शेतकऱ्यांमध्ये किती संताप आहे याची जाणीव कदाचित सरकारला झालेली दिसत नाही. परंतु शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष असून या अटीशर्तींमुळं बहुतांश शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. त्यामुळं अटीशर्ती रद्द केल्याशिवाय किंवा तसं आश्वासन दिल्याशिवाय माघार नाही, हे त्यांना स्पष्ट शब्दांत परंतु नम्रपणे सांगितलं.

– आ. रोहित पवार

### रुग्णालयातीलच मेडिकलमधून औषध खरेदीची सक्ती करणाऱ्यांना दणका...

आर्थिक भार सहन करावा लागत होता. अनेक औषधे बाहेरील मेडिकलमध्ये कमी किमतीत किंवा जेनेरिक स्वरूपात उपलब्ध असूनही रुग्णांना पर्याय नाकारला जात असल्याची बाब एफडीएच्या निदर्शनास आली होती. याबाबत बोलताना आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले की, औषध खरेदी करण्याचे स्वातंत्र्य हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांना लागणाऱ्या औषधांचे प्रिस्क्रिप्शन डॉक्टरांनी नातेवाइकांच्या हाती देणे बंधनकारक राहील. त्यानंतर संबंधित व्यक्तीला कोणत्याही नोंदणीकृत मेडिकलमधून औषधे खरेदी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल. मुंढे यांनी सांगितले की, एखाद्या विशिष्ट ब्रँडचे औषध उपलब्ध नसल्यास जेनेरिक पर्याय निवडण्याचाही अधिकार रुग्णांना राहील. त्यामुळे औषधांच्या किमतींमध्ये स्पर्धा निर्माण होऊन सर्वसामान्य रुग्णांचा खर्च कमी होण्यास मदत होणार आहे. आरोग्य क्षेत्रातील जाणकारांच्या मते, या निर्णयामुळे रुग्णालयांमधील औषध विक्रीवरील एकाधिकारशाहीला मोठा आळा बसणार असून रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण होण्यास मदत मिळेल. विशेषतः गंभीर आजारांवर उपचार घेणाऱ्या आणि मोठा वैद्यकीय खर्च करणाऱ्या कुटुंबांना या निर्णयाचा मोठा दिलासा मिळणार आहे.एफडीएच्या या आदेशामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत रुग्णकेंद्रित दृष्टिकोनाला बळ मिळणार असून रुग्णालयांच्या औषध विक्रीसंदर्भातील मनमानीवर प्रभावी नियंत्रण येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### ४० लाख शेतकऱ्यांना कर्जमाफीचा विनाअट लाभ : फडणवीस

पूर्ण केलीय. हे करत असताना ४ हजार ३९८ दिवस हा लॉगेस्ट इलेक्टेड पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा विक्रम मोडला. या निमित्तानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी महाराष्ट्र सरकारनं जाहीर केलेल्या पीक कर्जमाफीसंदर्भात माहिती दिली आहे. ते म्हणाले, ही कर्जमाफी जशी पुढं जाईल त्यातील अडचणी समोर येतील, त्या अडचणी सोडवण्याची जबाबदारी या उपसमितीची असेल. कुठल्याही निवडणुका समोर नसताना ही कर्जमाफी केलेली आहे. विरोधी पक्षांनी कोणतीही ठोस मागणी न करता केलेली कर्जमाफी आहे. शासनानं स्वत: केलेली कर्जमाफी आहे. आमच्या डोळ्यासमोर राजकीय हेतू नाही, आपल्या शेतकऱ्याला कसं सक्षम करता येईल. अन्यथा २०२९ ची निवडणूक असल्यानं डिसेंबर २०२८ ला कर्जमाफी करता आली असती,ते आम्ही केलेलं नाही. आज राज्यात अनेक शेतकरी असे आहेत आपला माल निर्यात करत आहेत. अनेक शेतकरी असे आहेत जे शेतीत परिवर्तन करत मॉडेल शेती तयार करत आहेत. शेतीला फायद्यात आणत आहेत. मात्र गरीब शेतकऱ्यांना मदत करावी लागेल आणि सक्षम करावं लागेल. सरकार ते करेल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. याशिवाय वित्त विभागासंदर्भात बोलायचं तर आता तरी अर्थ विभाग माझ्याकडेच आहे, असं देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

### शेतकऱ्यांनी सरकारच्या सूचनांचा वापर करावा

एल निनोसंदर्भात आपण तयारी करत आहोत. राज्यावर त्याचा परिणाम होईल आणि टास्कफोर्स आपण तयार केला आहे. जलसंधारणावर आपण भर दिला आहे. पाऊस कमी असला तरी आपण मार्ग काढूयात. राज्य सरकारच्या सल्ल्याच्या आधारे पेरणी केली तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही. शेतकऱ्यांनी संयम ठेवावा, ॲडव्हायजरीकडे लक्ष द्यावे, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

# राहाता विनयभंग प्रकरणी ग्रामस्थांचा पोलीस ठाण्यावर मोर्चा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता येथे दिनांक ९ जून रोजी दाखल झालेल्या विनयभंगाच्या गुन्ह्यात पोलीसांनी पिडीत मुलीला जबाबा वेळी धमकावल्याच्या आरोपावरून संतप्त नातेवाईकांसह ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढत आपल्या तक्रारी चा पाढ वाचला आहे. दि ६ जून रोजी मेहंदी कोन आणण्यास गेलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस पकडून बळजबरीने आपल्या फ्लॅट मध्ये नेऊन तिच्या शी गैरवर्तन केल्य प्रकरनी राहाता शहरातील हरीदास अर्जुन गायकवाड यावर विनयभंगा सह गुन्हा दाखल करण्यात आला होता . गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता पोलीस निरीक्षक दिपक सरोदे यांनी मोठ्या शिताफीने तिन दिवसानंतर अटक केली होती.

या गुन्ह्या चा तपास महिला पोउनि कुमावत यांच्या कडे सोपविण्यात आला होता. पिडीत मुलीस तपासा दरम्यान पोलीसांनी बोलावत उलट प्रश्न करत आरोपी च्या बाजूने जबाब दे असा दबाव आणल्याचा प्रकार झाल्याचे सदर पिडीतेने आपल्या नातेवाईकांकडे तक्रार केली होती. मुली सोबत झालेल्या प्रकाराची माहिती मुली च्या आईने माजी नगरसेविका सुनिता टाक यांच्या निदर्शनास आणून दिली. टाक यांनी पोलीस दबाव टाकत असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ व विद्यमान नगराध्यक्ष डॉ स्वाधीन गाडेकर सह नगरसेवकांना दिली असता ग्रामस्थांचा उद्रेक झाला.

या घटनेचा उद्रेक होताच नगराध्यक्ष डॉ गाडेकर यांचे सह शेकडो महीला पुरुष ग्रामस्थांनी राहाता पोलीस ठाणे गाठले. परिस्थितीचे गांभीर्य आलेल्या जमावाच्या तिव्र भावना समजून घेत पो नि सरोदे शांततेचे आवाहन केले.



### पोलीस आरोपीला कठोर शासन करणार : पो. नि. सरोदे

या गुन्ह्यात जास्तीत जास्त सखोल अभ्यास करून आणखी काही कलमे वाढवता येतील का याचा तपास सुरू आहे . आरोपीस कठोरातील कठोर कारवाई होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत .आरोपी पोलीस कस्टडीत असल्याने आमच्या तपासावर कोणताही परिणाम होणार नाही याची काळजी घेणे आपल्या सर्वांचे जबाबदारी आहे .जे कायद्याने बांधील आहे ते मला कायद्याने करायचे आहे ते मी सर्व करणार आहे कायद्याच्या चौकटीत राहून जे करता येईल ते करू माझे तपासावर तुम्हाला शंका असल्यास तुम्ही स्वतः माहिती घेऊ शकता परंतु आरोपीला कायद्याच्या चौकटीत राहून कठोरातली कठोर शिक्षा होण्यासाठी आम्ही ती तयारी करत आहोत. त्यासाठी आम्ही बांधील असल्याचे राहाता पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांनी सांगितले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी आरोपी ची धिंड काढावी , आरोपीस मदत केल्या प्रकरणी त्याचा मुलगा आकाश गायकवाड व शबाना शेख यांना सह आरोपी करावे, महिला पोलिस तपासी अधिकारी कुमावत या पिडीत मुलीला आरोपी च्या बाजूने जबाब देण्यासाठी दबाव आणत असून त्यांचे कडून तपास काढून घ्यावा अशी मागणी केली . व निवेदन स्विकारले. पिडीतेवर बलात्कारच घटना घडण्याच्या दरम्यान पिडीत मुली शी शारीरीक संबंध झाल्या चे तिचे मेडीकल तपासणीत निष्पन्न झाले आहे . परंतू पिडीते शी झालेले शरीर संबध हे दर आरोपीने केले आहेत का? जर झाले असेल तर फक्त विनयभंगाचा गुन्हा दाखल आहे . आणी आरोपी ने पिडीत मुलीशी खरोखरच शरीर संबंध ठेवले असल्यास आरोपीवर बलात्काराचे कलम लागू शकते. पिडीते शी नेमके कुणाबरोबर शरीर संबध आले याचा शोध घेण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात पिडीतेस तपासणी करण्यात येणार असून यावर गुन्ह्याची व्याप्ती ठरणार आहे..तर आरोपीच्या घरावर बुलडोजर फिरवू – नगराध्यक्ष – .गाडेकर राहाता शहरात जो गंभीर गुन्हा घडला त्या गुन्ह्यात असलेल्या आरोपीला अटक केल्याबद्दल पोलीस प्रशासनाचे आम्ही आभार मानतो.

सखोल तपास सुरू आहे, यात अजून कुणी गुन्हेगार आहेत का याचाही तपास सुरू आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली आपण पोलिसांना सहकार्य करत आहोत .डॉ . सुजय विखे यांनी सांगितल्याप्रमाणे शिर्डी मतदार संघात असलेल्या कुठल्याही गुन्हेगाराला थारा देणार नाही महिलांची छेड काढणारा असेल त्याची गय केली जाणार नाही. त्याचे घरावर सुद्धा कारवाई केली जाईल आरोपीच्या घराचे बेकायदेशीर बांधकाम असेल तर ते पाडण्यासाठी नोटीस दिली आहे. डॉ. सुजय विखे यांचा शब्द अंतिम असून त्यांचा शब्द खरा करण्यासाठी मी व माझे नगरसेवक दादांचा शब्द पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे राहाता नगर परिषदेचे नगराध्यक्ष डॉ . स्वाधीन गाडेकर यांनी सांगितले.

# उपजिल्हा रुग्णालयातील हलगर्जीपणाचा आरोप

## प्रसूतीसाठी महिलेला खासगी रुग्णालयाचा आधार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील नेवरगाव येथील आदिवासी समाजातील देवयानी शुभम गायकवाड या महिलेला शुक्रवारी पहाटे प्रसूतीसाठी गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्रसूती ग्रस्त महिलेस खासगी रुग्णालयात जाऊन प्रसूती करावी लागल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

१२ जुन रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या दरम्यान देवयानी गायकवाड यांना प्रसूतीसाठी गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, कर्तव्यावरील डॉक्टर व परिचारिका यांनी सुरुवातीला तपासणी करण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. वारंवार विनंती केल्यानंतर तपासणी करून सदर प्रसूती येथे होणार नसल्याचे सांगण्यात आले व रुग्णास घाटी रुग्णालय अथवा खासगी रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला.

रुग्णाचे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून ते आदिवासी समाजातील आहे. त्यामुळे शासकीय रुग्णालयातच प्रसूती करून द्यावी, अशी विनंती नातेवाईकांनी केली. मात्र, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी नाईलाजाने शहरातील एका खासगी रुग्णालयात रुग्णास दाखल केले. तेथे आज दुपारी तिची सुखरूप प्रसूती झाली असून माता व बाळ दोघांचीही प्रकृती उत्तम आहे. या घटनेमुळे शासनाच्या सुरक्षित मातृत्व व संस्थात्मक प्रसूती योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> प्रतिक्रिया,
>
> सरकारी दवाखाने हे खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेच्या सेवेसाठी असतात मात्र या ठिकाणी डॉक्टर आणि इतर अधिकारी कर्मचारी हे मुख्यालयाच्या ठिकाणी राहत नसल्यामुळे रुग्णांची सातत्याने गैरसोय होते ५० खाटाचे रुग्णालय आणि प्रशिक्षित उच्चशिक्षित अधिकारी कर्मचारी असताना एका गरीब आदिवासी महिलेची खाजगी दवाखान्यामध्ये प्रसूती करावी लागणे हे लज्जास्पद आहे. संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करावे तसेच उपजिल्हा रुग्णालयातील सर्व रिक्त जागा तात्काळ भराव्या नसता वैद्यकीय अधीक्षकाच्या दालनाला टाळे ठोकू.
>
> **वाल्मिक शिरसाठ, अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद प्रतिष्ठान गंगापूर**

# पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त बेलापूरात वृक्षारोपण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकाराने सलग १२ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करून एक नवा इतिहास रचला आहेत. तालुक्यातील बेलापूर येथे राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या वाढदिवसानिमित्त बेलापूर खुर्द येथे सय्यद बाबा व गरीबशाह बाबा दर्गा भागात वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर, पंतप्रधान नरेंद्र मोदी व नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निरोगी व दीर्घायुष्याची त्याचबरोबर देशात शांतता समृद्धी नांदावी, याकरिता प्रार्थना करण्यात आली, यावेळी दोन्ही दर्गाहवर चादर चढून सामूहिक प्रार्थना करण्यात आली.

मा.खा.डॉ.सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी आणि जिल्हाध्यक्ष रऊफ शेख यांच्या सूचनेनूसार श्रीरामपूर भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी, प्रदेश उपाध्यक्ष फत्तुभाई सय्यद, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते दीपक पटारे, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष शरद नवले,श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे, भाजपा सरचिटणीस प्रफुल्ल डावरे, गिरीधर आसने, बबनराव मुठे, मिलिंद साळवे, हरदास आदी सह पदाधिकारी मोठ्या संख्येने मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे जिल्हा सह संयोजक साजिद शेख,अकोले शहर मंडल अध्यक्ष आसिफभाई पोपटिया, श्रीरामपूर ग्रामीण अध्यक्ष अजिज उर्फ भैय्याभाई शेख,जीना शेख, जाकीर शेख ,मोहसीन सय्यद, माजित पठाण आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी भाजपाचे हिंदू-मुस्लिम पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगर परिषद वैजापूर अंतर्गत स्वच्छता मोहीम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : नगर परिषद वैजापूर अंतर्गत स्वच्छता विभागाच्या माध्यमातून शहरात मान्सून पूर्व नालेसफाई करण्यात आली आहे. पालिकेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी शुक्रवारी (ता.१२) स्वच्छ्ता विभागाची बैठक घेऊन शहराची नालेसफाई व स्वच्छता बद्दल आढावा घेतला व शहरातील सर्व नाले नदीपात्र इत्यादी स्वच्छता केल्याची खात्री करून पावसाळ्यात शहरात पाणी साचणार नाही हे सुनिश्चित केले.

शहरातील सर्व १२ प्रभागामधील नालेसफाई पूर्ण करून वैजापूर नगर परिषद मान्सून पूर्व नियोजन करण्यात आले आहे. स्वच्छता विभागाचे पी.एस.पवार, प्रमोद निकाळे व रमेश त्रिभुवन यांनी शहरातील विविध भागात करण्यात आलेली नालेसफाई व स्वच्छता याबद्दल मुख्याधिकारी भागवत बिघोत यांना अहवाल सादर केला. पालिकेचे अध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही नालेसफाई मोहीम राबविण्यात आली.


## CHANGE OF NAME

I Have Change My Old Name **Jabbar Jafar Khan** (Husband Name As Per Wife Old Passport No.B2736072) To New Name As **Jabbarkhan Jafarkhan Pathan** (As Per My Passport No.X9533797 Vide Aadhar No.7534 7738 2026)

## CHANGE OF NAME

I Have Change My Old Name **Hasina Jabbar Khan** (Name As Per Old Passport No.B2736072) To New Name As **Hasinabee Jabbarkhan Pathan** (Vide Aadhar No.3704 5015 4057)


## निधन वार्ता

### बाबासाहेब मुखेकर



**प्रवरानगर** : राहाता तालुक्यातील दाढ बुद्रुक येथील प्रयोगशिल शेतकरी बाबासाहेब भागवत मुखेकर यांचे वयाच्या ७५ व्यावर्षी अल्यशा आजारांने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,पुतणे, भाऊ एक मुलगी सुना,जावई नातवंडे, असा परिवार असून ते वेसुव्हियस इंडिया ली.चे संचालक राजेश मुखेकर आणि दुध उद्योजक रविंद्र मुखेकर यांचे वडील तर रावसाहेब मुखेकर यांचे भाऊ होते.

### स्वप्निल काळे



**श्रीरामपूर** : शहरातील वॉर्ड नं. ७, साधना हॉटेलजवळ वास्तव्यास असलेले स्वप्निल अशोक काळे (वय ३५) यांचे गुरूवार, दि. ११ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, चुलते, दोन बहिणी, चुलत बंधु असा परिवार आहे. स्व. स्वप्निल हे अशोक गोविंदराव काळे यांचे चिरंजीव व स्वस्त धान्य दुकानदार रवींद्र काळे यांचे पुतणे तसेच प्रविण, सचिन, मनोज व किरण काळे यांचे ते चुलत बंधु होत.

### रमनलालजी संचेती



**श्रीरामपूर** : सारोळा कासार येथील मूळ रहिवासी सध्या घोडनदी (शिरूर) येथे स्थाईक असलेले रमनलाल रायचंद संचेती यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांचे मागे प्रकाशलाल, रसिकलाल, ईश्वरलाल संचेती हे बंधू, सौ. कांताबाई कचरदास बलदोडा (करमाळा) व सौ. प्रमिला रमेश कोठारी (श्रीरामपूर) या दोन बहिणी तसेच प्रशांत संचेती हे चिरंजीव तथा शोभा कर्नावट, सुवर्णा सुराणा, तृप्ती दुधेडिया ह्या मुली, भाजपा अहिल्यानगर शहर मध्य मंडळ उपाध्यक्ष पियूष संचेती, प्रितम संचेती, चिराग संचेती, उत्कर्ष संचेती हे पुतणे, ऋषभ, आयुष, आदित्य, सम्यक, हर्ष, जय हे नातवंड, तीन जावई, सुना असा मोठा परिवार आहे.


## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक : जन्म-मृत्यु/एसआर/२५९/२०२५
नेवासा दिनांक. ११/०३/२०२६

अर्जदार श्री श्रीम-याकोब लहानु गाडे रा. महालक्ष्मी हिवरे ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. माधव यादव गाडे यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म - मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१. मृत्यु नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-कै. माधव यादव गाडे, गावाचे नाव-महालक्ष्मी हिवरे, मृत्यु दिनांक-०१/०१/२००९

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**


## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार, दि.१३ जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९ २७८ ३७७ | ८ - २ | १५० २४० ६०० | जोड ७०-४६-३१ २५-६९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४५ २३५ ५५० | ६ - ३ | १२० ६७० ३०० | जोड ०७-१३-२६- ८९-३४ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १५६ १२९ ११० | ९ - १ | १३० १४९ ११२ | जोड २०-८४-५१- ७९-४३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द • ख • ल

## अन्न भेसळविरोधी मोहिमेमुळे ग्रामीण भागातील व्यावसायिक सतर्क

**अमरापूर :** राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर अन्न भेसळ रोखण्यासाठी राज्यभर धडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या कारवायांचा परिणाम ग्रामीण भागातील छोटे-मोठे व्यावसायिकांवरही होत असून, शेवगाव तालुक्यासह परिसरातील व्यापारी वर्ग अधिक सतर्क झाल्याचे चित्र दिसून येत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी, शेवगाव, पाथर्डी तसेच शेवगाव तालुक्यातील बोधेगाव, बालमटाकळी, राक्षी, चापडगाव, हातगाव, कांबी, मुंगी, शहर टाकळी, दहिगावने, अमरापूर, आव्हाणे आदी प्रमुख बाजारपेठांमध्ये अन्नसुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीवर भर देण्यात येत आहे. एफडीएच्या पथकांकडून मिठाई दुकाने, हॉटेल्स, खानावळी, बेकरी, फळ विक्रेते, गुटखा-मावा विक्रेते, पाणीपुरी केंद्रे, शीतपेय दुकाने, पानटपऱ्या, मसाला उद्योग, वडापाव विक्रेते, दुग्धजन्य पदार्थ विक्रेते तसेच इतर खाद्य व्यावसायिकांच्या आस्थापनांवर अचानक भेटी देऊन अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी पाठविले जात आहेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास दंडात्मक कारवाई केली जात असल्याने व्यावसायिकांमध्ये जागरूकता वाढली आहे. ग्रामीण भागात अन्नसुरक्षा व मानके कायद्याबाबत पुरेशी माहिती नसल्याने अनेक व्यावसायिकांकडून अनवधानाने नियमभंग होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे स्वच्छता, परवाने, अन्नपदार्थांची गुणवत्ता, उत्पादन व साठवण व्यवस्था याकडे व्यापाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. अनेक व्यावसायिक आवश्यक कागदपत्रे अद्ययावत करण्याच्या तयारीत असल्याचेही दिसून येत आहे. दरम्यान, संबंधित विभागाने तपासणीबरोबरच ग्रामीण भागातील लघु व्यावसायिकांसाठी जनजागृती व मार्गदर्शन शिबिरे आयोजित करावीत, अशी मागणी व्यापारी वर्गातून होत आहे. नियमांची सविस्तर माहिती मिळाल्यास अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणे अधिक सुलभ होईल, असे मत काही व्यावसायिकांनी व्यक्त केले.

## कागदपत्रांचा गैरवापर करत महिलेची फसवणूक

**अहिल्यानगर :** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेचा विश्वास संपादन करून तिच्या नावावर परस्पर दुचाकी खरेदी करत फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आरोपीने महिलेशी ओळख वाढवून, तिच्याकडून कागदपत्रे घेतली आणि तिचा विश्वासघात केला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपी रणजित भोसले याने पीडित महिलेला वारंवार फोन करून तिच्याशी तोंडओळख वाढवली होती. तो नेहमी तिच्याशी गोड बोलत असे. या गोड बोलण्याच्या जाळ्यात ओढून त्याने महिलेचा पूर्ण विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपीने महिलेच्या नावावरील कागदपत्रांचा वापर करून एक दुचाकी गाडी खरेदी केली. इतकेच नव्हे तर या गाडीवर एका नामांकित फायनान्स कंपनीकडून कर्जदेखील मंजूर करून घेतले. हा सर्व प्रकार महिलेच्या लक्षात आल्यानंतर तिने आरोपीकडे विचारणा केली. मात्र, त्याने असा कोणताही प्रकार केला नसल्याचे सांगत हात झटकले. आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्यानंतर महिलेने एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणी भादंवि कलम ४०६ नुसार गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस हवालदार पितळे करत आहेत. या घटनेमुळे परिसरात चर्चा सुरू आहे.


## २०२५ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेत परिचारांची विक्रमी पदोन्नती




**अहिल्यानगर :** जिल्हा परिषदेच्या परिचर संवर्गातून आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर तब्बल ८५ परिचारांची पदोन्नती करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने परिचारांना पदोन्नती मिळाली आहे. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे आदी उपस्थित होते. परिचर संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष निलेश गाडेकर, सागर आगरकर, सचिन चितळे, ऋषिकेश बनकर, राहुल साळवे, अनिल येनगुल, भरत शेंडगे, दादा बरबडे, किरण खेडकर, चंद्रशेखर इरकर, विजय वाबळे आदी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, शासन निर्णय २०२५ मधील अधिसूचनेनुसार आज जिल्हा परिषदेमध्ये इतिहासात पहिल्यांदाच ८९ पैकी ८५ परिचर पदोन्नतीने आरोग्य सेवक झाले. चार जणांनी नकार दिला.ही प्रक्रिया अतिशय पारदर्शक समुपदेशनाने पार पाडली. पदोन्नती झालेल्या सर्वांचे अभिनंदन. अहिल्यानगर जिल्ह्याची परंपरा सातत्याने पुढे राहण्याची आहे, ती या पदोन्नतीच्या माध्यमातून कायम ठेवली. त्यांनी सर्व परिचर बांधवांचेही सहकार्याबद्दल आभार मानले.

## किराणा दुकान फोडले; पावणेदोन लाखांचा मुद्देमाल लंपास

**अहिल्यानगर :** नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सारोळा कासार येथे एक मोठी चोरीची घटना समोर आली आहे. चोरट्यांनी एका किराणा दुकानाचे शटर उघडून आत प्रवेश केला आणि



दुकानातील सामान, रोकड असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सारोळा कासार येथील रहिवासी गणेश अनिल कडूस यांचे गावातच केटरिंग आणि किराणा दुकान आहे. १० जून रोजी रात्री दुकान बंद केल्यानंतर ते घरी गेले होते. दरम्यान, रात्री १० वाजेपासून ते ११ जून रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या दुकानाला लक्ष्य केले. चोरट्यांनी दुकानाचे शटर उघडून आत प्रवेश केला. दुकानात ठेवलेले १ लाख रुपयांचे किराणा सामान, ज्यामध्ये गावरान तूप, सुकामेवा, तेल डब्बे, चहापावडर, सिगारेट आणि मसाल्यांचा समावेश होता, ते चोरून नेले. तसेच पुराव्यासाठी दुकानातील ५ हजार रुपये किमतीचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डिव्हीआर मशीन आणि गल्ल्यातील ८० हजार रुपयांची रोकडही चोरट्यांनी लंपास केली. सकाळी चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर गणेश कडूस यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी पोलीस हवालदार भवार यांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस हवालदार लाड करत आहेत. पोलीस आता परिसरातील इतर सीसीटीव्ही आणि गुप्त माहितीच्या आधारे अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

# युवकाची टॉवरवर चढून जीव देण्याची धमकी...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** कर्जत : घरगुती वाद घडल्याने एक २२ वर्षीय युवक चक्क कर्जत शहरातील मोबाईलच्या टॉवर चढत त्याने वरून खाली उडी मारत जीव देण्याची धमकी दिली. प्रत्यक्षदर्शींनी तात्काळ पोलीस दलास सदर घटनेची माहिती दिली. पोलिसांसह कुटुंबातील व्यक्तींनी देखील त्यास खाली येण्याची विनंती केली मात्र त्याने कोणताही प्रतिसाद दिला नाही. रात्री उशिरापर्यंत त्या युवकाची मनधरणी करण्याचा प्रयत्न सुरू होता.

गुरुवार, दि ११ रोजी संध्याकाळी ५ च्या सुमारास घरगुती वाद घडल्याने मयुर काळे (वय २२ वर्षे) या युवकाने कर्जत शहराच्या एका मोबाईल टॉवर वर चढला. आणि आपण घरगुती वादामुळे वरून खाली उडी मारत जीव देण्याची धमकी देऊ लागला. यावेळी प्रत्यक्षदर्शींनी त्यास खाली ये. तुला कोणी काही करणार नाही अशी हाक देखील दिली. मात्र तो कोणालाही जुमानत नसल्याने तात्काळ कर्जत पोलीस दलास वरील घटनेची माहिती देण्यात आली. कर्जत पोलीस देखील तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्याच्या कुटुंबास देखील पाचारण करण्यात आले. मात्र मयुर काळे कोणाचेही ऐकण्याच्या मनःस्थितीमध्ये नव्हता. तब्बल दोन-अडीच तास या युवकाने सर्वानाच चांगले जेरीस आणले. कर्जत पोलीस प्रशासन आणि कुटुंबातील व्यक्तींनी त्यास ध्वनी प्रेक्षपकद्वारे वारंवार खाली येण्याची विनंती केली. पण तो आपल्या निर्णयावर ठामच राहिल्याने अखेर त्याच्या सुरक्षिततेसाठी कर्जत नगरपंचायतीचे अग्निशमन विभाग, आरोग्य विभाग सतर्क ठेवण्यात आले असून अहिल्यानगरच्या विशेष रेक्यु टीमला देखील रात्री उशिरा पाचारण करण्यात आले. स्थानिक पोलीस प्रशासन या युवकास खाली आणण्यासाठी प्रशासन शर्थीचे प्रयत्न करीत होते. अंधार पडल्याने त्याच्या बचावासाठी मर्यादा पडत होते.

### युवक टॉवर वर..... तर कर्जतकर गच्चीवर

एक युवक मोबाईल टॉवरच्या उंचीवर चढला असल्याची माहिती कर्जत शहरात वाऱ्यासारखी पसरली. अनेक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. तर अनेकांनी इमारतीच्या गच्चीवर चढत त्या युवकाची स्टंटबाजी पाहिली. जसा जसा अंधार वाढत गेला तेव्हा नागरिक गच्चीवरून खाली सरकले. मात्र प्रशासन त्याच्या सुरक्षिततेसाठी विजेच्या बॅटरीच्या प्रकाशात शर्थीचे प्रयत्न करताना दिसत होते.

# नाना डोंगरेंचा नाना पाटेकरांकडून गौरव

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र भूषण २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे दि. २० जून रोजी होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, आशू सुरपूर, संदिप रासकर प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी कार्यक्रम. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन. महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम. आयोजीत केले जातात. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल डोंगरे यांचे अभिनंदन होत आहे.

# हरवलेल्या मतिमंद मुलाची आईशी सुखरूप भेट

### भाजपच्या संगीता घोडेकर यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** तालुक्यातील पारगाव सुद्रीक येथील श्रीकांत संतोष रेपाळे हा मतिमंद मुलगा श्रीगोंदा शहरातून हरवल्यानंतर दिवसभर चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र भाजप कार्यकर्त्या संगीता घोडेकर, कर्जत पोलिस आणि स्थानिक कार्यकर्त्यांच्या समन्वयातून श्रीकांतचा शोध लागून त्याची आईशी सुखरूप भेट घडवून आणण्यात आली.

श्रीकांतच्या पायाला काही दिवसांपूर्वी दुखापत झाली होती. त्याच्या उपचारासाठी त्याची आई त्याला श्रीगोंदा येथे घेऊन आली होती. मेडिकल दुकानाबाहेर बसवून औषध घेण्यासाठी गेल्यानंतर श्रीकांत अचानक बेपत्ता झाला. मतिमंद असल्याने तो नेमका कुठे गेला याचा कोणताही मागमूस लागत नव्हता. त्याची आई दिवसभर मुलाचा शोध घेत होती.दरम्यान, दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास कर्जत येथील भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सुनीलकाका यादव यांचा संगीता घोडेकर यांना फोन आला. बहिरोबावाडी बसस्थानक परिसरात एक मुलगा आईचा शोध घेत असल्याची माहिती त्यांनी दिली. चौकशी केल्यानंतर मुलाने स्वतःचे नाव श्रीकांत रेपाळे व गाव पारगाव असल्याचे सांगितले. इतर माहिती देण्यास तो असमर्थ होता.

सुनीलकाका यादव यांनी तत्काळ मुलाला सुरक्षित ताब्यात घेत कर्जत पोलिसांच्या स्वाधीन केले. त्याला जेवणाचीही व्यवस्था करून दिली. संगीता घोडेकर यांनी पारगाव परिसरात संपर्क साधून मुलाची ओळख निश्चित केली. श्रीकांत मतिमंद असल्याचे समजल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांचा शोध घेणे सोपे झाले. अखेर श्रीकांतच्या आईशी संपर्क साधण्यात आला. मुलगा सापडल्याची माहिती मिळताच ती भावुक झाली. मजुरी करून घर चालविणाऱ्या या महिलेपुढे कर्जतपर्यंत जाण्याची अडचण होती. त्यामुळे घोडेकर यांनी कर्जत पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून सहकार्याची विनंती केली.पोलिसांनीही तत्परता दाखवत श्रीकांतला सुरक्षितपणे श्रीगोंदा परिसरात आणून सोडले. आईच्या चेहऱ्यावर परतलेले हास्य आणि मुलाची सुरक्षित घरी परतफेड हीच या प्रयत्नांची खरी पावती ठरली.

# समाजसेवक अण्णा हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**सुपा :** ज्येष्ठ समाजसेवक तथा पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त राळेगणसिद्धी येथे रविवारी (दि. १४ जून) भव्य मोफत महाआरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्यदूत फाउंडेशन व शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत असून परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

श्री संत निळोबाराय विद्यालय, राळेगणसिद्धी येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत होणाऱ्या या शिबिरामध्ये जनरल तपासणी, हृदय रोग तपासणी, मोफत डोळे तपासणी व चष्मा वाटप, ईसीजी तपासणी, बी.पी. व मधुमेह तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी तपासणी तसेच सांधेदुखी व गुडघेदुखी तपासणी अशा विविध आरोग्य सेवा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. याशिवाय वृद्ध नागरिकांना मोफत वॉकिंग स्टिकचे वाटपही करण्यात येणार आहे.

समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरासोबतच १४ व १५ जून रोजी भव्य रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणीची सुविधा मिळणार असून गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या उपक्रमासाठी अनिल लंके, स्वप्नील सोमवंशी, अमोल मापारी, लहारे ओते यांच्यासह राळेगणसिद्धी परिसरातील कार्यकर्ते परिश्रम घेत असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घ्यावी व रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### रक्तदात्यांना ५ लाख रुपयांचे विमा संरक्षण

महाआरोग्य शिबिरासोबत आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास तब्बल ५ लाख रुपयांचा अपघाती विमा मोफत देण्यात येणार आहे. १४ व १५ जून रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत हे रक्तदान शिबिर होणार असून युवक, नागरिक व सामाजिक संस्थांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. रक्तदानातून गरजू रुग्णांना जीवनदान मिळणार असून समाजसेवेचा एक महत्त्वपूर्ण संदेशही या माध्यमातून दिला जाणार आहे.

# महिलेला सव्वा दोन लाखाला गंडा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका महिलेची ऑनलाइन फसवणूक करून तिच्या बँक खात्यातून सव्वादोन लाख रुपये लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. हनुमान नगर परिसरातील एका गृहिणीने या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली असून अज्ञात बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेचे पती गॅस वितरणाचे काम करतात. त्यांच्या मोबाईलवर एका अनोळखी क्रमांकावरून वाहतूक पोलिसांच्या दंडाचे बनावट डिजिटल पत्रक (प फाईल) आले होते. ते पत्रक खरे असल्याचे समजून त्यांच्याकडून चुकून डाऊनलोड झाले. त्यानंतर मोबाईलमध्ये तांत्रिक अडचण आल्याने त्यांनी ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधला. समोरील अज्ञात व्यक्तीने ओळख पटवण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून ओळखपत्राचे शेवटचे चार अंक मागवून घेतले. ही माहिती देताच अवघ्या काही वेळातच महिलेच्या बँक खात्यातून सुरुवातीला एक लाख, त्यानंतर पुन्हा एक लाख आणि शेवटी पंचवीस हजार रुपये असे एकूण दोन लाख पंचवीस हजार रुपये चोरट्यांनी बेकायदेशीरपणे काढून घेतले. पैसे कपात झाल्याचा संदेश मिळताच पीडित कुटुंबाने तात्काळ राष्ट्रीय सायबर गुन्हे कक्षाशी संपर्क साधून तक्रार नोंदवली. प्राथमिक चौकशीत या रकमेतील एक लाख चौऱ्यांशी हजार रुपये वेगवेगळ्या संशयास्पद बँक खात्यांमध्ये वर्ग झाल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून सायबर पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांनी कोणत्याही अनोळखी लिंकवर क्लिक करू नये किंवा ओळखपत्राची माहिती अनोळखी व्यक्तीला देऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# आ. दातेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत दिग्गजांचा राष्ट्रवादीत प्रवेश



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**गुरुवार :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त माटुंगा, मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात आयोजित भव्य कार्यक्रमा दरम्यान पारनेर तालुक्याच्या राजकारणात मोठी घडामोड घडली. पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत तालुक्यातील विविध पक्षांतील अनेक दिग्गज नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा, उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, माजी मंत्री धनंजय मुंडे, पारनेर, आ. काशिनाथ दाते, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांचे उपस्थित संपन्न झाला.

या प्रवेशामध्ये वसंतराव चेडे, भाळवणी येथील उद्योजक शिवसेना शिंदे गटाचे संदिप रोहोकले, भाजपचे नगरसेवक अशोक चेडे, दत्तात्रय कुलट, शिवसेनेचे नगरसेवक नवनाथ सोबले, कांतीलाल ठाणगे, भाऊ ठुबे, माऊली औटी, सिद्धेश्वरवाडी माजी सरपंच आप्पासाहेब नरोडे तसेच योगेश दावभट, विकास केरूभाऊ रोहोकले, पवन संजय रोहोकले, उद्धव गुंजाळ, दिलीप विश्वनाथ रोहोकले, संदीप बिबिशन साळुंके, हरिदास रंगनाथ रोहकले, सुनिल बाबाजी चेमटे, मच्छिंद्र गोपाळा रोहोकले, संतोष भाऊसाहेब रोहकले, दत्ता कृष्णा सुरुसे, राहुल गुंजाळ, मनोहर विठ्ठल रोहोकले यांसह पारनेर शहर व तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

पारनेर तालुक्यातील विविध राजकीय प्रवाहांतील प्रभावी नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरल्याने स्थानिक राजकारणात नव्या समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः आगामी नगरपंचायत, ग्रामपंचायत आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पक्षप्रवेशाला मोठे राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. या प्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद आणखी वाढली असून तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. गेल्या काही काळात आ. दाते यांनी मतदारसंघात राबविलेल्या विकासकामांमुळे, सर्वसामान्य नागरिकांशी ठेवलेल्या सातत्यपूर्ण संपर्कामुळे आणि सर्वसमावेशक नेतृत्वामुळे विविध पक्षांतील नेते व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आकर्षित होत आहे.

आज स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख व सर्वसमावेशक विचारसरणी मधून घालून दिलेल्या आदर्शांच्या जोरावर मार्गक्रमण करत असलेल्या पक्षात अनेक मान्यवरांनी प्रवेश करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच अभिमानास्पद राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची संघटनात्मक ताकद दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे. पारनेर तालुक्यात आ. दाते सरांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून जनतेचा दृढ विश्वास संपादन केला जातो. त्यांच्यावरील विश्वासामुळेच विविध पक्षांतील नेते आणि कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसकडे आकर्षित होत आहेत. आगामी काळात हा वाढता जनाधार पक्षाला अधिक बळ देणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे. **प्रशांत गायकवाड**

# धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या 'मास्टर माईंड'ला शोधा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शहरामध्ये काही समाजकंटकांना आपल्या राजकीय स्वार्थासाठी दंगल घडवून आणायची आहे. दंगल ही व्यापार, उद्योग, समाजाला उध्वस्त करते. बेरोजगार करते. नगरकरांना दंगल नको शांतता हवी आहे. उद्योग, व्यापारासाठी सकारात्मक वातावरण, तरुणाईला दर्जेदार शिक्षण आणि याच शहरात रोजगार, एमआयडीसीत राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपन्या आयटी पार्क हवा आहे. गोरगरीब, कष्टकरी, कामगारांना सुखाने व शांततेने पोट भरता यावे एवढीच माफक अपेक्षा त्यांची आहे.

त्यामुळे माळीवाडा गोमांस प्रकरणातील भोसले नामक आरोपी महिलेला अटक करून धार्मिक तेढ निर्माण करू पाहणाऱ्यांचा पर्दाफाश केल्याबद्दल पोलीस दलाचे विशेष कौतुक आम्ही करतो. अशी मागणी ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांच्याकडे केली आहे.

बकरी ईदच्या रात्री माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीत गोमांस टाकल्याचा प्रकार उघड झाला होता. यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता. दीडशेहून अधिक सीसीटीव्ही फुटेजचे पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण केले. यावेळी सुशांत म्हस्के, संजय झिंजे, मनोज गुंदेचा, विलास उबाळे, अनिस चुडीवाला, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, दीपक भोसले, राम वाणी, चंद्रकांत उजागरे, राम झिने, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना रणशूर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, राम धोत्रे, किशोर कोतकर, शंकर आव्हाड, विनोद शिरसाट, विजय शिरसाट, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते.

### दंगल नको, रोजगार द्या : किरण काळे

**आरोपीचा जबाब न पटणारा :**

किरण काळे म्हणाले, भीक मागून उदरनिर्वाह करते. त्यावेळी कुणीतरी दिलेला पण नको असलेल्या मांसाचा तुकडा माळीवाड्यात टाकला, हा आरोपीचा जबाब कदापि पटणारा नाही. मुळात भीक मागण्यासाठी मुस्लिम वेश परिधान करणं, संशयास्पद वाटाव्या अशा हालचाली करण अनेक प्रश्न उपस्थित करतात. भीक म्हणून मांस कोण देतं? हा आरोपीचा बनाव आहे. केवळ अर्धसत्य समोर आलं आहे. पोलिसांनी पूर्ण सत्य समाजासमोर आणावं.


प्रो. फी जमा.रु.

पान.नं. दि. //२०२६

### सायटेशन नोटीस

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**

ची.अ.नं.२४५/२०२६

अर्जदार
श्री. शाहीन यूसुफ शेख रा. शेवगाव
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. शाहीन यूसुफ शेख रा. शेवगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर यांचा जन्म ०१.०६.१९७४ रोजी शेवगाव ता. शेवगाव जि.अ.नगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्म/मृत्यू चा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म /मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची स्वतःची नोंदणी प्रमाणपत्र (जन्म/मृत्यू दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांना शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांची स्वतःची जन्म/मृत्यू नोंद पंचायत समिती कार्यालय/ग्रापचांयत कार्यालय यांच्या जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेऊन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने नगरपरिषद / ग्रामपंचायत कार्यालय येथे जावुन जन्म / मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म/मृत्यू ची नोंद नसलेबाबत दि. ०६.०४.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे. जन्म / मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवू शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांची स्वतःची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोटांत दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहून अर्जदाराचे सदरहू जन्म / मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत दि. २१/०६/२०२६ पूर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यू नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. ०५.०६.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

(शिक्का) हुकमावरुन

सही/-
तहसिलदार शेवगाव

# वरुडे खून प्रकरणातील आरोपी अवघ्या काही दिवसातच गजाआड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** शिरूर वरूडे,येथे दोन दिवसांपूर्वी ओट्यावर झोपलेल्या एका ४३ वर्षीय व्यक्तीचा गळा चिरून खून केलेल्या घटनेचा उलगडा करण्यात शिक्रापूर पोलिसांना यश आले आहे.

जुन्या भांडणाच्या आणि शिवीगाळीच्या रागातून गावातीलच एका अल्पवयीन मुलाने हा खून केल्याची कबुली पोलिसांना दिली आहे.

शिक्रापूर पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (डउइ समांतर तपास करीत अवघ्या ४८ तासांत गुन्हा उघडकीस आणला आहे. याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन मुलाला पोलिसांनी अटक केली आहे.

शिक्रापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाळासो बबन तांबे (वय-४३ रा. रानमळा, वरूडे, ता. शिरूर) हे सोमवारी (ता. ०८) रात्री १;१५ वाजण्याच्या सुम ारास घरात उकाडा होत असल्या कारणाने घराबाहेर ओट्यावर झोपण्यासाठी गेले होते. झोपेत असताना, रात्रीच्या अंधारत मारेकऱ्याने त्यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने प्रहार करून त्यांचा निघृण खून केला होता. मयताचे भाऊ प्रकाश बबन तांबे यांनी दिलेल्या तक्रारीवरून शिक्रापूर पोलीस ठाण्यात अज्ञात




आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पुणे ग्रामीणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शिक्रापूर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेला (डउइ) समांतर तपासाचे आदेश दिले.

पोलिसांनी मयताच्या भूतकाळातील वादांचा आणि शत्रुत्वाची सखोल माहिती घेण्यास सुरुवात केली. संशयाची सुई वरूडे गावातीलच एका अल्पवयीन मुलाकडे वळली. पोलिसांनी तात्काळ त्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची दिलेली कबुली दिली.

मयत बाळासो तांबे आणि या अल्पवयीन मुलामध्ये दोन वर्षांपूर्वी भांडण झाले होते. हा जुना राग मनात असतानाच, ८ दिवसांपूर्वी मयत बाळासो तांबे यांनी या मुलाला पुन्हा रस्त्यात गाठून शिवीगाळ केली आणि मारहाण करण्याची धमकी दिली होती. याच अपमानाचा आणि रागाचा बदला घेण्यासाठी या अल्पवयीन मुलाने ८ जूनच्या रात्री बाळासो ओट्यावर झोपल्याची संधी साधून त्याने धारदार लोखंडी कोयत्याने त्यांच्या गळ्यावर वार करून त्यांचा खून केला.

शिक्रापूर पोलिसांनी सदर अल्पवयीन मुलाला पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडू खून करण्यासाठी वापरलेला १ लोखंडी कोयता जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा पुढील पोलीस हवालदार सोमनाथ कचरे आणि पोलीस कॉन्स्टेबल सुजित जगताप करत आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिक्रापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षिरसागर, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे यांचेसह श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, स्थानिक गुन्हे शाखेचे जनार्धन शेळके, राजु मोमीन, तुषार पंदारे, संन नाथन गाळ, शिकापुर पोलीस ठाण्यातील पाणात रुपालादार।पपगस पाटील, रोहीदास स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रमोद क्षिरसागर, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे यांचेसह श्रेणी पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, स्थानिक गुन्हे शाखेचे जनार्धन शेळके, राजु मोमीन, तुषार पंदारे, संजु जाधव, सागर धुमाळ, शिकापुर पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार विकास पाटील, रोही पारखे, शिवाजी चितारे, श्रीमंत होनमाने, अमोल दांडगे, अमोल नलगे, प्रतिक जगताप, नारायण वाळके, राम जाधव, मच्छिंद्र निचीत यांनी केली आहे.

## दखल

### शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या; राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

वळती, प्रतिनिधी : राज्यातील शेतकरी वाढत्या उत्पादन खर्च, नैसर्गिक आपत्ती, शेतीमालाला मिळत नसलेला योग्य भाव आणि कर्जबाजारीपणामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या जाचक अटी रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या वतीने करण्यात आली.यासंदर्भात आंबेगाव तहसील कार्यालयात नायब तहसीलदार बांगर यांना निवेदन देण्यात आले. पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष धोडीभाऊ भोर व युवकाध्यक्ष विशाल वाबळे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात शासनाच्या पूर्वीच्या कर्जमाफी योजनांतील अटींमुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचे नमूद करण्यात आले आहे. सततची नापिकी, अवकाळी पाऊस, वाढलेले बियाणे-खतांचे दर आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आला असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून कोणत्याही अटींशिवाय सरसकट कर्जमाफी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली

### श्री सोमेश्वर सह. साखर कारखान्याच्या उपाध्यक्षपदी किसन तांबे

सोमेश्वरनगर : बारामती तालुक्यातील श्री सोमेश्वर सह.साखर



कारखान्याच्या व्हाईसचेअरमन किसन तांबे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अगोदरचे व्हाईसचेअरमन मिलिंद कांबळे यांनी आपल्या उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर ही निवड करण्यात आली. संचालक मंडळाची बैठक सोमेश्वर कारखान्याच्या जिजाऊ सभागृहात दि. ११ रोजी पार पडली यावेळी उपाध्यक्षपदी तांबे यांची निवड करण्यात आली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या सूचनेनुसार बारामतीचे राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष संदीप बांदल यांनी नावाची घोषणा केली. यावेळी उपाध्यक्ष पदाला किसन तांबे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बारामतीचे सहाय्यक निबंधक प्रमोद दुरगुडे यांनी काम पाहिले.

### पन्नासहून अधिक युवतींना मेसेजद्वारे त्रास देणारा जेरबंद

तळेगाव ढमढेरे : शिक्रापूर (ता. शिरूर) सह परिसरातील वेगवेगळ्या महिला व युवतींना वारंवार मेसेज करून त्रास देणाऱ्या युवकाला शिक्रापूर पोलिसांच्या पथकाने जेरबंद केले असून विशाल राजेंद्र गव्हाणे असे सदर युवकाचे नाव आहे. परिसरामध्ये काही युवती व महिलांना वारंवार एका स्वतंत्र मोबाईल नंबर वरून वेगवेगळ्या प्रकारचे तसेच महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न होणारे मेसेज येत असल्याची घटना घडत होती. याबाबत एका युवतीने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात युवकावर गुन्हा दाखल केला होता, सदर गुन्ह्याचा तपास करत असताना पोलीस हवालदार बापू हाडगळे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मिळालेल्या माहितीनुसार काही महिला व युवतींची विचारपूस केली. यावेळी विशाल गव्हाणे या संशयित युवकाची माहिती मिळताच पोलीस हवालदार बापू हाडगळे यांनी सदर युवकाकडे चौकशी करत त्याचा मोबाईल तपासला असता त्याच्या मोबाईल मधून पन्नासहून अधिक महिला व युवतींना मेसेज केल्याचे उघड झाले, त्याच्याकडे चौकशी केली असता त्याला एक सिम कार्ड सापडले होते तसेच एका कंपनीच्या कामगारांच्या व्हाट्सअप ग्रुप मधून काही महिला व युवतींचे नंबर मिळाले असल्याने त्यांना मेसेज करत असल्याचे त्याने सांगितले, दरम्यान पोलिसांनी विशाल राजेंद्र गव्हाणे (रा. बेलवंडी ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर) याला ताब्यात घेतले असून पुढील तपास शिक्रापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बापू हाडगळे करत आहे.

### 'सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

भोर, प्रतिनिधी : सनातन संस्था व मंदिर महासंघ यांच्या



संयुक्त विद्यमाने भोर तालुक्यासह पुणे जिल्ह्यातील विविध भागांत आयोजित करण्यात आलेल्या 'सनातन संस्कार प्रशिक्षण वर्गा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ९ ते १५ वयोगटातील तब्बल ४८८ बालकांनी या वर्गात सहभाग घेतला, तर समारोप सत्रात १८५ पालक उपस्थित होते.उन्हाळी सुट्टीच्या काळात मंदिरांच्या सात्त्विक वातावरणात आयोजित करण्यात आलेल्या या पाच दिवसीय प्रशिक्षण वर्गात मुलांना प्रार्थना, नामजप, आदर्श दिनचर्या, चांगल्या सवयी, नैतिक मूल्ये, भारतीय संस्कृती, कथाकथन, आध्यात्मिक खेळ आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे मार्गदर्शन करण्यात आले.सनातन संस्थेचे प्रा. विठ्ठल जाधव यांनी सांगितले की, डिजिटल युगात मोबाईल व दूरचित्रवाणीच्या वाढत्या प्रभावामुळे मुलांना संस्कारांची गरज अधिक आहे. त्यासाठी असे उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहेत. भोर, जुन्नर, बारामती, हडपसर, कोथरूड, पिंपरी-चिंचवड आदी भागांत हे वर्ग यशस्वीपणे पार पडले. या उपक्रमासाठी स्थानिक नागरिक, मंदिर विश्वस्त आणि लोकप्रतिनिधींनी मोलाचे सहकार्य केले.

# शॉर्ट सर्किटमुळे दोघा भावांचे संसार उद्ध्वस्त; १५ ते २० लाखांचे नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वळती :** आंबेगाव तालुक्यातील वळती येथील वाळुंज मळा परिसरात शुक्रवारी (दि. १२) दुपारी शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत दोन सख्ख्या भावांच्या घरांतील धान्य, संसारोपयोगी साहित्य, रोख रक्कम, दुचाकी, कपडे, फर्निचर व इतर मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले. या दुर्घटनेत भोर कुटुंबीयांचे अंदाजे १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किसन नामदेव भोर व हरिभाऊ नामदेव भोर या दोन सख्ख्या भावांच्या घरात अचानक शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केल्याने संपूर्ण घर धुराच्या लोटांनी वेढले गेले. दरम्यान, त्यांचे पुतणे महेश भोर यांनी घराला आग लागल्याचे लक्षात येताच तात्काळ दोन्ही कुटुंबीयांना फोनद्वारे माहिती दिली. मात्र, तोपर्यंत आगीने मोठा फैलाव केला होता.

या आगीत घरात साठवून ठेवलेले सुमारे १५ पोती गहू, बाजरी व अन्य धान्य, रोख ७२ हजार रुपये, कपडे, ताडपत्र्या, केबल वायर,



फर्निचर, दुचाकी तसेच संसारोपयोगी साहित्य आणि इतर अनेक मौल्यवान वस्तू जळून खाक झाल्या. अनेक वर्षांच्या कष्टाने उभा केलेला संसार काही क्षणांत राख झाल्याने दोन्ही कुटुंबांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. तसेच भीम ाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अग्निशाम क वाहन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाच्या तत्परतेमुळे आगीवर वेळेत नियंत्रण मिळवण्यात यश आले आणि पुढील अनर्थ टळला. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

या घटनेत आमचे जवळपास १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे किसन भोर व हरिभाऊ भोर यांनी सांगितले. दरम्यान, वळती गावचे ग्राममहसूल अधिकारी वैभव गाढवे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

महावितरण कंपनी, महसूल विभाग व संबंधित प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त कुटुंबांना मदत करावी तसेच शासनाच्या आपत्ती निवारण निधीतून आर्थिक सहाय्य द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## सडे पठारे हे पर्यटन विकासाचे मॉडेल ठरतील : प्रशांत खाडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** पुणे जिल्ह्यातील सर्वांग सुंदर व निसर्ग संपन्न जुन्नरच्या पश्चिम घाटातील सडे-पठारे खूपच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. येथील गवताळ कुरण संवर्धन व विकास योजनेतून शेतकऱ्यांना सक्षम करणारे सडेपठारे पर्यटन विकासाचे मॉडेल ठरतील अशा रितीने विकसित केली जातील अशी माहिती जुन्नर वनविभागाचे



उपवनसंरक्षक (डी एफ ओ) प्रशांत खाडे यांनी क्षेत्रीय भेटी दरम्यान वेळी दिली.

वनविभागाच्या सडे पठारे संवर्धन समितीचे सदस्य आणि राज्य सांस्कृतिक धोरण समितीचे सदस्य गणेश कोरे, वनहक्क समितीचे सदस्य किरण लोहकरे यांच्यासह सहाय्यक वनसंरक्षक स्मीता राजहंस यांनी हिवरे पठार येथील सडेपठारांची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. ही सडे पठारे पर्यावरणीय समृद्ध असून, त्यांना असलेले जागतिक अनन्यसाधारण महत्व पाहता पठारांच्या पर्यारणीय शाश्वत विकासाठी युनेस्कोच्या ग्लोबल जीओपार्कमध्ये समावेश करण्यासाठी आराखडा करा, असे पत्र आमदार शरद सोनवणे यांनी वन विभागासह जिल्हा प्रशासनाला दिले आहे. त्यानंतर ही पाहणी करण्यासाठी क्षेत्रीय भेटीचे आयोजन करण्यात आले होते.तांबे, सुकाळवेढे, दुर्ग ढाकोबा,हिवरे पठार या भागात ही वैशिष्ट्यपुर्ण गवताळ पठारे आहेत. काही भाग वनविभागाच्या क्षेत्रात मोडत आहे.तर काही खाजगी शेतकऱ्यांची माळराने आहेत.या सर्वांचा विकसनाचा आराखडा तयार करण्यापुर्वी ग्रामस्थ,येथील ग्रामपंचायतीचे पदाधिकारी यांची बैठक येत्या काही दिवसांत घेतली जाईल.या बैठकीत गवत या विषयातील तज्ञांकडून प्रबोधन केले जाईल.गवताळ कुरणे विकसित करताना,येथील क्षेत्रमालकांना पशुधनासाठी चाऱ्यांची लागवड,आणि त्यातून पशुपालनातून अर्थार्जन कसे करता येईल या विषयी मार्गदर्शन दिले जाणार आहे असे सांगून खाजगी क्षेत्रात पर्यटनाच्या माध्यमातून लोक अर्थार्जन करू शकतील अशा प्रकारे सडेपठार संवर्धनाचे एक मॉडेल प्रथमच जुन्नर तालुक्यात विकसित केले जाईल असे ते म्हणाले.

### दुग्धव्यवसाय विकसित होईल

**सुकाळवेढे - हिवरे पठार पर्यावरणदृष्ट्या समृद्ध असून या पठारावरील जैवविविधतेच्या संवर्धनातून निसर्ग आणि धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल आहोत. गवताळ प्रदेशाच्या संवर्धनातून पशुधनाला चांगले गवत देखील मिळेल. यातुन आदिवासी भागात दूध व्यवसायाला चालना मिळेल.**

**- दत्ता गवारी**

**अध्यक्ष -वरसुबाई देवस्थान ट्रस्ट सुकाळवेढे**

**- हिवरे तर्फे मिन्हेर**

### सर्व सदस्यांच्या भेटीसह ग्रामस्थांची बैठक घेणार

**''जुन्नर वनविभागातील पश्चिमघाटातील सडे पठारांच्या संवर्धनासाठी जुन्नर वनविभागाने अभ्यासक तज्ञांची समिती स्थापन केली आहे. युनेस्कोच्या ग्लोबल जिओपार्क साठीचा आराखडा करण्याचे प्रयत्न आहेत. त्यासाठी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी सुरु केलेला पाठपुरावा येथील शेतकरी आणि पशुधनाच्या विकसनासोबत पर्यटनाच्या कक्षा रुंदविण्यासाठी फायदेशीर ठरेल. -प्रशांत खाडे**

**(उपवनसंरक्षक,जुन्नर वनविभाग)**

### वादळी वाऱ्यामुळे नुकसान, केळी पिकासाठी तातडीच्या उपाययोजना कराव्यात : सचिन हाके

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

बारामती : सध्या खरीप हंगामपूर्व झालेल्या गारपीट, अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्यांमुळे अनेक ठिकाणी केळी पिकाचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी केळीची झाडे पडली असून काही ठिकाणी खोड तुटल्याच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी तातडीने योग्य उपाययोजना कराव्यात, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी सचिन हाके यांनी केले आहे. वादळी वाऱ्यामुळे पडलेली किंवा कललेली केळीची झाडे २४ ते ४८ तासांच्या आत सरळ करून त्यांना बांबू किंवा मजबूत काठ्यांच्या सहाय्याने आधार द्यावा. वाढीच्या अवस्थेतील झाड पूर्णपणे तुटले असल्यास ते काढून टाकून निरोगी तलवार छाट करून खोडवा राखावा. घडधारणेच्या अवस्थेतील झाडांना विशेष काळजी घेऊन आधार द्यावा तसेच खराब, जखमी किंवा कुजलेल्या फण्या काढून टाकाव्यात. शेतात किंवा मुळांभोवती साचलेले पाणी तात्काळ काढून टाकावे. दीर्घकाळ पाणी साचल्यास मुळांना इजा होऊन झाडे सडण्याची शक्यता वाढते. मुळांच्या वाढीसाठी ह्युमिक ॲसिड किंवा समुद्री शेवाळ अर्काचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोल्यांसाठी अठ्ठावीस लाखांचा निधी



शिक्रापूर (ता. शिरूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या निधीसाठी पार पडलेल्या बैठकीवेळी उपस्थित मान्यवर.(छायाचित्र आकाश भोरडे)

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथील पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्यांसाठी तब्बल अठ्ठावीस लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती शिरूर पंचायत समितीचे उपसभापती रामभाऊ सासवड यांनी दिली आहे.

शिक्रापूर (ता. शिरूर) येथील पी. एम. श्री. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्या बांधकामासाठी निधी मंजूर करण्याची मागणी शालेय पदाधिकाऱ्यांनी पंचायत समि तीकडे केली होती, त्याबाबत नुकतीच बैठक संपन्न झाली यावेळी उपसभापती रामभाऊ सासवडे, गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर, अतुल पिसाळ, युवासेना प्रमुख विजय लोखंडे, मुख्याध्यापिका चारुशीला लोखंडे, आदर्श शिक्षक सुरेश सातपुते, माजी उपसरपंच नवनाथ सासवडे, ग्राम पंचायत सदस्य सचिन सासवडे, उद्योजक युवराज मांढरे, दिलीप कोठावळे, सनी जाधव यांसह आदी उपस्थित होते, यावेळी झालेल्या बैठकीत पंचायत समितीच्या माध्यम ातून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत शाळेच्या वर्ग खोल्यांसाठी अठ्ठावीस लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले, यावेळी शालेय समिती व ग्रामस्थांनी पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.


# बैलजोडी वादावर ४८ तासांत 'सन्मानाचा मार्ग' शोधणार

### माऊलींच्या रथाला बैलजोडी लावण्या संदर्भात उत्कंठा कायम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** बैलजोडी निवड प्रक्रियेवरून निर्माण झालेल्या वादाला अखेर संवादाचा मार्ग मिळाला असून, पुढील ४८ तासांत सन्मानपूर्वक तोडगा काढण्याच्या आश्वासनानंतर उमेश रानवडे यांनी सुरू केलेले बहुचर्चित बेमुदत उपोषण मागे घेतले.

उपोषण स्थगितीच्या वेळी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे, सदस्य विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे,



**वादग्रस्त मुद्द्यावर ४८ तासांच्या आत योग्य आणि सन्मानजनक निर्णय घेण्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आले. त्यानंतर उमेश रानवडे यांनी आपले बेमुदत उपोषण स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे वातावरणातील तणाव काही प्रमाणात निवळला असून आता होणाऱ्या चर्चेतून अंतिम तोडगा काय निघतो, याकडे भाविकांसह संबंधितांचे लक्ष लागले आहे.**

रामभाऊ भोसले, रमेश कुऱ्हाडे, व्यवस्थापक माऊली वीर तसेच माजी नगराध्यक्ष व मानकरी राहुल चिताळकर पाटील उपस्थित होते. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी उपोषणकर्ते उमेश रानवडे, माजी नगराध्यक्ष व मानकरी राहुल चिताळकर पाटील, देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, पालखी सोहळा प्रमुख विश्वस्त राजेंद्र उमाप आणि बैलजोडी समि तीचे प्रतिनिधी नंदकुमार कुऱ्हाडे यांच्यात चर्चा होणार असल्याचे निश्चित करण्यात आले. संबंधित सर्व घटकांनी समन्वयाने आणि परस्पर सहमतीने मार्ग काढण्याचे मान्य केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक ललिता शंकर शितोळे यांची मौजे दापोडी, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्रं. १४१/३ मध्ये ०१ हेक्टर ६० आर क्षेत्र आहे. सदर मिळकतीबाबत मे. दुय्यम निबंधक केडगाव यांचे कार्यालयात दि. ०२.०२.२००७ रोजी नोंदविलेले साठेखत दस्त क्रं. ५५३/ २००७ व दि. २०.०२.२००७रोजी नोंदविलेले खरेदीखत दस्त क्रं. ८२३/ २००७ हे दोन्ही दस्त दापोडी ते केडगाव प्रवासादरम्यान हरविलेले आहे. सदर दस्त हरविले बाबतची तक्रार ललिता शितोळे यांनी यवत पोलीस स्टेशन येथे दि. ११.०६.२०२६ रोजी नोंदविलेली असून त्याचा गु.र. नं. २८२/२०२६ असा आहे. सदर दस्त कोणाला मिळून आलेस त्यांनी वरील ठिकाणी संपर्क करावा ही विनंती.

दिनांक - १२/०६/ २०२६

**श्री. इंद्रजित विलास रगडे**
**ॲडव्होकेट**
**पत्ता - चौधरी प्लाझा, उरुळी कांचन,**
**ता- हवेली, जिल्हा - पुणे**
**मो. ९४२२३१३७८७ / ९७६५९१८७८७**

द•ख•ल

## राशीन ग्रामपंचायत ६ प्रभागांच्या आरक्षण सोडत जाहीर



**राशीन :** निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कर्जत तालुक्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीच्या सदस्य आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर झाला. संपूर्ण कर्जत तालुक्याचे लक्ष लागलेल्या राशीन ग्रामपंचायत सहा प्रभागांच्या आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. त्यासाठी राशीन ग्रामपंचायत मध्ये विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सदस्य पदांसाठी अनुसूचित जाती अनुसूचित जमाती इतर मागास प्रवर्ग तसेच महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्यात आली. यावेळी मंडळ अधिकारी विश्वास राठोड, ग्रामपंचायत अधिकारी रोहिदास कापरे, कामगार तलाठी अतुल सुपेकर, अल्लाउद्दीन काझी, विक्रमराजे भोसले, भीमराव साळवे, दादा परदेशी, अतुल साळवे, राम कानगुडे, विजयकुमार साळवे, बापू साळवे, दत्ता गोसावी, अशोक जंजिरे, कमलेश साळवे, रामकिसन साळवे, मयूर धनवडे, अंबादास जाधव, गणेश कदम यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण सोडतीमुळे आगामी ग्रामपंचायत निवडणुकांचे चित्र स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. इच्छुक उमेदवार आणि स्थानिक राजकीय गटांचे लक्ष प्रक्रियेकडे लागले होते.

## मृत्यूशी झुंज देणाऱ्या पंधरा वर्षाच्या वडाच्या झाडाचे पुर्नरोपन



**लिंपणगाव :** विज वितरणाला अडथळा ठरणाऱ्या श्रीगोंदा शहरातील स्टेशन रोडवरील एक वड काढला हा वड रस्त्याच्या बाजुला मृत्युशी झुंज देत होता जगतगुरु संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष नवनाथ दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीगोंदा शहरातील वृक्षप्रेमींनी क्रेन च्या साह्याने वन विभागाच्या जागेत गुरुवारी या झाडाचे रोपन केले पुनर्रोपन केले जेसीबीच्या साह्याने खड्डा खोदण्यासाठी धनराज कोंथबीरे व जमीर जकाते यांनी मदत केली नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत यांनी पाच हजार लिटरचा टॅंक्टर पाठविला तीन फुट व्यास आणि दहा फुट उंच असलेला वडाच्या झाडांचे रोपन करण्याचा वृक्षप्रेमींनी आनंद लुटला जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे माजी सभापती उमेश परहर म्हणाले श्रीगोंदा जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज वृक्ष संवर्धन समितीने झाडे लावण्यासाठी चांगली चळवळ हाती घेतली आहे तरी काळाची गरज ओळखून सर्व नागरिकांनी या चळवळीत योगदान देण्याची गरज आहे. यावेळी माजी उपनगराध्यक्ष अशोक खेंडके धनराज कोंथबीरे नवनाथ दरेकर नानासाहेब कोंथबीरे ऋतीक शिंदे उमेश प्रहार संजय पटवा प्रा बापू देवकर अॅड सुनील दरेकर गौरव मेहेत्रे जमीर जकाते झहीर जकाते यांनी रोपन करण्यासाठी श्रमदान केले फोटो सोबत जोडला आहे.

## शेवगाव तालुक्यात ११ गावासह ५७ वाड्यां - वस्त्यांना टॅंकरने पाणी पुरवठा सुरू

**हातगाव :** उन्हाळ्याचा चालू हंगाम संपत आला असून कधी नव्हे एवढी उन्हाची तीव्रता शेवगाव तालुक्यात वाढली असल्यामुळे तसेच जमिनीतील पाणी पातळी खोलवर जाऊन पाण्याचा स्वर्स कमी झाल्यामुळे तालुक्यातील अनेक गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे प्रशासनाकडून तशा प्रकारची तजवीज सुरू असतानाच सध्या तालुक्यात ११ गावांना व ५७ वाड्या - वस्त्यांना टॅंकरने पाणी पुरवठा सुरू असल्याबाबतची माहिती पंचायत समिती कार्यालयातून समजली आहे. उन्हाळ्याच्या चालू हंगामात उष्णतेने शिखर गाठले असून होरपळून निघालेल्या तालुक्यातील ज्या गावांना टॅंकरने पाणी पुरवठा होत आहे त्या मध्ये वाडगांव - मुर्शतपूरसह, ठाकूर निमगाव व हसनापूर रोडवरील वस्त्या/थाटे गावासह जायभाय,शिरसाठ, केदार, पावन गणपती, बिरोबा, जवरे लवण या वस्त्यासह थाटे रोड,खरडगाव रोड/वाडगाव गावासह मारुती , गायकवाड, जवरे, खंडागळे या वस्त्यासह हसनापूर रोड/ आखेगाव व त्याखालील मुर्शतपूर रस्ता, सोनवाडा, सोपान, काटे, राजवाडा वस्त्या/बेलगावसह पोपळे व शरद नगर वस्ती/सोनेसांगवीसह पारध्ये व आंधळे वस्ती/ बाडगव्हाणसह बोधेगाव व बालमटाकळी रस्त्यावरील वस्त्या/ मुरमीसह मोहटादेवी रस्ता,गायकवाड रस्ता व वंजार वस्ती/ लाडजळगावसह पवार , कोकाटे, काळे, बारापट्टा,शेलार ,धनगर, ढाकणे,तहकीक, मुरुमखान या वस्त्यासह सुरातमलतांडा/ राक्षी गावासह घोटण रोड जगधने वस्ती व ठाकूर निमगाव रोड जगधणे वस्ती /आणि चेडेचांदगावसह जऱ्हाड , जवळे व कणसे वस्ती या ११ गावासह ५७ वाड्या - वस्त्यांना टॅंकरने पाणी पुरवठा सुरू असून सन २०११ च्या जनगणनेनुसार या सर्व गावांची व वाड्यावस्त्यांची मिळून १५ हजार ४५५ एवढी लोकसंख्या लक्षात घेता प्रति मानसी २० लिटर या प्रमाणे ८ टॅंकरने दिवसभरातून १० ते १२ खेपाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचेही या वेळी सांगण्यात आले आहे.

## लिंपणगाव ग्रामपंचायतचे आरक्षण सोडत जाहीर

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या समजल् जाणाऱ्या लिंपणगाव ग्रामपंचायतचे आरक्षण सोडत दिनांक १० जून रोजी जाहीर करण्यात आले. आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदाच्या आरक्षणाची सोडत ग्रामपंचायत कार्यालय मध्ये उत्साहाच्या वातावरणात पार पडली. आरक्षण नियमावलीनुसार पाच प्रभागातील एकूण १३ सदस्य पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, सोडत जाहीर होताच गावातील आता राजकीय घडामोडीला वेग आला आहे. दरम्यान जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार प्रभाग क्रमांक एक मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, तर प्रभाग क्रमांक दोन मध्ये नागरिकांचा मागास प्र वर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण प्रभाग क्रमांक तीन मध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक चार मध्ये दोन जागा असून येथे अनुसूचित जाती महिला व सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक पाच सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण अशा प्रकारे या प्रभागामध्ये सोडत निश्चित करण्यात आले. तर प्रभाग क्रमांक चार मध्ये अनुसूचित जाती महिलांसाठी चिट्ठी पद्धतीने सोडत जाहीर करण्यात आली. दरम्यान लिंपणगाव ग्रामपंचायतचे मागील काही महिन्यामध्ये विभाजन करण्यात आले. आता मात्र लिंपणगाव ग्रामपंचायत ही स्वतंत्र अस्तित्वात आली आहे.

# खरवंडी कासार बंद : रास्ता रोको

### वाढत्या चोऱ्यांविरोधात नागरिकांचा संताप



**खरवंडी कासारमध्ये वाढत्या चोऱ्यांविरोधात बाजारपेठ बंद ठेवून ; रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला होता.**

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**खरवंडी कासार :** खरवंडी कासार परिसरात गेल्या तीन दिवसांपूर्वी दोन ठिकाणी सशस्त्र दरोडा पडल्याच्या घटनेनंतर, तसेच गेल्या काही महिन्यांत झालेल्या अनेक चोऱ्यांचा तपास न लागल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून, येथिल पोलीस चौकी कायम स्वरूपी चालू राहावी व येथिल पोलीस कर्मचारी संख्या वाढावी झालेल्या घटनेचा शोध घेऊन गुन्हेगाराला जेरबंद करावे या मागणीसाठी आज खरवंडी कासार गाव बंद ठेवून नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन केले.

सामाजिक कार्यकर्ते आजिनाथ कीर्तने, किसन आव्हाड, गणेश जवरे आणि लहू दराडे सरपंच सुनिल खेडकर सुरेश खेडकर रावसाहेब किर्तने गणेश खेडकर दत्तात्रय पठाडे सुरेश खेडकर मल्हारी खेडकर यांच्या सह अनेक युवक व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आजिनाथ कीर्तने म्हणाले, यापूर्वीही या भागात अनेक चोरीच्या घटना घडल्या आहेत त्याचा तपास लागलेला नाही तोच आता पुन्हा चोऱ्या सुरू झाल्या आहेत दरोडा पडला आहे दरोडेखोराकडून मारहाण होत आहेत आता माणसे घरात सुरक्षीत नाहीत वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. आमची मागणी मान्य न झाल्यास यापुढे मोठे जनआंदोलन उभारू.

किसन आव्हाड यांनी सांगितले, या तालुक्यात गुन्हेगारीच्या घटना वाढत आहेत. मुलीच्या बेपत्ता होण्याचे प्रकार वाढले आहेत चोरी लुटमार होत आहे गुन्ह्याचा तपास तातडीने करावा. येथे नवीन पोलीस स्टेशन निर्मितीसाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी प्रशासनाने सोडवाव्यात. खरवंडी कासार चौकीतील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून पोलीस अधिकाऱ्याची नेमणूक करावी. अन्यथा पाथर्डी येथील नाईक चौकात मोठे जनआंदोलन करू. असा इशारा त्यानी दिला

आंदोलकांनी खरवंडी कासार पोलीस चौकी २४ तास कार्यान्वित करावी, दोन पोलीस उपनिरीक्षक आणि ७ ते ८ पोलीस कॉन्स्टेबल २४ तास उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी केली. यावेळी पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव, पोलीस उपनिरीक्षक निवृत्ती आगरकर आणि नायब तहसीलदार प्रभाकर शेटेकर यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पोलीस उपनिरिक्षक विलास जाधव यांनी सांगितले की खरवंडी कासार चौकित पोलीस कर्मचारी संख्या वाढली असून या पुढे ११२ नंबर वर काम करणारे कर्मचारी ही या भागात राहणार आहेत पोलीस प्रशासनाकडून झालेल्या घटनेचा तपास सुरू आहे लवकरच या घटनेचा शोध लावला जाईल. गावातील चौकात सिसि टिव्ही बसवावेत या मागणीला उत्तर देताना नायब तहसीलदार प्रभाकर शेकटकर म्हणाले की आपली मागणी तहसिलदार प्रांताधिकारी यांच्या मार्फत वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात येईल.

## भाळवणीत मटन-चिकन दुकानांची तपासणी

### अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी मोहीम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने भाळवणी येथील मटन विक्रेत्यांना मार्गदर्शन करताना अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार व सहाय्यक आयुक्त इंगळे व इतर मान्यवर.

**छाया : अभिजीत कपाळे**

**भाळवणी :** जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन टीमकडून भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्या व्यावसायिकांच्या दुकानांची तपासणीच्या अनुषंगाने पारनेर तालुक्यातील भाळवणी येथील मटन, चिकन विक्री करत असलेल्या दुकानांची तपासणी नुकतीच करण्यात आली. यावेळी अहिल्यानगर येथील अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न व औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त सो.ह. इंगळे यांनी व्यावसायिकांना ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून घेत सर्व व्यावसायिकांचे प्रबोधन केले.

यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार यांनी मटन-चिकन दुकानांमधील स्वच्छता, शुद्ध पाण्याचा वापर, वेस्ट मटेरियलची विल्हेवाट यासंदर्भात व्यावसायिकांचे प्रबोधन केले तर अन्न व औषध प्रशासन सहाय्यक आयुक्त इंगळे यांनी दुकानांची नोंदणी करुन फुड लायसन्स काढून घेणे व त्यासाठी लागणारी कागदपत्रे याविषयी प्रबोधन केले. व येत्या तीन दिवसांत सर्व व्यावसायिकांनी नोंदणी प्रमाणपत्र काढून घेण्यासाठी मार्गदर्शन केले व पुढील कारवाई टाळण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

ग्रामविकास अधिकारी वाघ यांना संबंधित व्यावसायिकांचे लायसन्स तपासणी करुन खात्री करण्याचे तसेच वडापाव, भेळ यांसारख्या पदार्थांसाठी वृत्तपत्रांच्या कागदांचा वापर न करण्यासाठी संबंधित व्यावसायिकांना नोटीसा बजावण्याचे निर्देश दिले. यासंदर्भात दि. ४/६/२०२६ रोजी संबंधित व्यावसायिकांची बैठक ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित करुन संबंधित व्यावसायिकांना समज दिली असल्याचे ग्रामविकास अधिकारी वाघ यांनी सांगितले.

यावेळी गावातील मटन - चिकन व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी प्रशासनास सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी सरपंच सौ. लिलाबाई रोहोकले, ग्रामपंचायत सदस्य युवराज रोहोकले, अमोल रोहोकले आदी उपस्थित होते.

## तबला विशारक परिषदेत देवाशिष कोरडेचे यश

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**करंजी :** आखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या एप्रिल २०२६ सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असुन, मिरी येथील अष्टविनायक संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा विद्यार्थी देवाशिष विजयकुमार कोरडे याने विशारद पूर्ण प्रारंभिक (तबला) ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होत विद्यालयाच्या व मिरी परिसराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

देवाशिषने नियमित रियाज करत जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर हे यश मिळविले आहे. त्याला अष्टविनायक संगीत विद्यालयाचे संचालक व तबला मार्गदर्शक प्रा.भैरवनाथ जरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल प्रशिक्षणामुळे देवाशिषला ही उल्लेखनीय कामगिरी करता आली. देवाशिष हा जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार कोरडे यांचा मुलगा आहे. त्याच्या या यशाबद्दल आमदार मोनिकाताई राजळे, आमदार अक्षय कर्डीले, बाळासाहेब अकोलकर, राहुल गवळी, एकनाथ झाडे, जालिंदर गवळी, भागिनाथ गवळी, राजुमामा तागडसह महादेव पाटील कुटे अण्णा पाटील शिंदे गोरख झाडे अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

## सरकारने शेतकऱ्यांचा सात - बारा सरसकट कोरा करावा : अॅड. लांडे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** महाराष्ट्र सरकारने घोषित केलेल्या कर्जमाफीत अनेक अटी व शर्ती घातल्याने अनेक शेतकरी कर्जमाफी पासून वंचित राहणार आहेत. ही घोषणा फसवी आहे. त्यामुळे राज्य सरकारने विनाअट व सरसकट सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफी करून शेतकऱ्यांचा सात - बारा कोरा करावा अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी अॅड. सुभाष लांडे यांनी केली आहे. भाकप व किसान सभेच्या वतीने राज्यातील सर्व शेतकऱ्यांना विनाअट व सरसकट कर्जमाफी मिळावी या मागणीसाठी शुक्रवारी (दि. १२) येथील तहसील कार्यालयावर निदर्शने आंदोलन करण्यात आले. यावेळी अॅड. लांडे बोलत होते. यावेळी बोलताना अॅड. लांडे म्हणाले की, राज्य सरकारने घोषित केलेल्या कर्जमाफी मध्ये अनेक अटी घातल्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार नसून केवळ बँकांची वसुली होणार आहे. या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना कुठलाही फायदा नाही. त्यामुळे ही कर्जमाफीची घोषणा फसवी असून शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी द्यावी, शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच खतांचे भाव प्रचंड वाढलेले असून शेतकऱ्यांना खते उपलब्ध होत नाही खताच्या दुकानासमोर रांगा लावा लागत आहे व मुक्कामही करावा लागत आहे तरीही खते मिळेनाशी झाली आहेत. यावेळी तहसीलदार आकाश दहाडदे यांना निवेदन आले. शेतकऱ्यांना सरसकट संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी व सातबारा कोरा करण्यात यावा. पाऊस झाल्यानंतर खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात स्वस्त दरात खतांचा पुरवठा करण्यात यावा. शेतकऱ्यांना कपाशी सह आवश्यक ती बियाणे सवलतीच्या दरात पुरवावे. आदी मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. या आंदोलनात भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. अॅड. सुभाष लांडे, कॉ. संदिप इथापे, कॉ. बापूराव राशिनकर, कॉम्रेड भिवा घोरपडे कॉ. अशोकराव नजन, कॉ. दत्तात्रय आरे, कॉ. रामभाऊ लांडे, कॉ. गोरक्ष काकडे, कॉम्रेड विष्णू गोरे, कॉ. अॅड भागचंद उकिर्डे, कॉ. मुरलीधर काळे, कॉ. सर्जेराव खोशे, कॉम्रेड अंकुश खोसे, कॉ. अर्जुन खैरे, कॉ. संतोष खोसे, कॉ. आकाश काळे , कॉ. बाबुलाल सय्यद आदी कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकासकामे केवळ निधीची नव्हे तर जनतेच्या समृद्धीची गुंतवणूक : आ. दाते

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील बाभुळवाडा परिसरातील पायाभूत सुविधा आणि जलसंधारणाला बळ देणाऱ्या विकासकामांचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यामध्ये बाभुळवाडा ते दरोडी रस्ता मुरुमीकरण काम तसेच जिल्हा परिषद लघु पाटबंधारे विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या को.प. बंधारा कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था सक्षम करण्याबरोबरच जलसंधारण आणि भूजल पातळी वाढविण्याच्या दृष्टीने ही दोन्ही कामे अत्यंत महत्त्वाची ठरणार आहेत. या कामांमुळे परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, नागरिक आणि वाहनधारकांना मोठा लाभ मिळणार असून सिंचन व्यवस्थेलाही बळकटी मिळणार आहे.

यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करायचा असेल तर रस्ते आणि पाणी या मूलभूत गरजांवर भर देणे आवश्यक आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावाला चांगले रस्ते, पाणी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. विकासकामे ही केवळ निधीची नव्हे तर जनतेच्या विश्वासाची आणि भविष्यातील समृद्धीची गुंतवणूक असते. या प्रसंगी भाजप राज्य कार्यकारिणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, प्रशांत जगदाळे, देवेंद्र जगदाळे, डॉ. सुरेश खणकर, विशाल खणकर, मनसुख कोरडे, दिगंबर जगदाळे, जयराम जगदाळे, प्रमोद खणकर, वसंत मातेरे, अच्युतराव जगदाळे, दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे, निशिगंधा बोरुडे, भाऊसाहेब जगदाळे, बबन शिर्के, महादू जगदाळे, संतोष बोरुडे, रेवणनाथ खणकर, शरद जगदाळे, अविनाश जगदाळे, दत्तात्रय क्षीरसागर, उत्तम जगदाळे, जय शिर्के, भाऊ खोडदे, भाऊ पटाडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.रस्ते आणि जलसंधारण या दोन्ही क्षेत्रांतील विकासकामांमुळे बाभुळवाडा परिसराच्या सर्वांगीण प्रगतीला नवी चालना मिळणार असल्याची भावना उपस्थित नागरिकांनी व्यक्त केली. आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून मतदारसंघात विकासकामांचा वेग वाढत असून ग्रामीण भागाच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचेही यावेळी नागरिकांनी नमूद केले.

> बाभुळवाडा परिसरातील रस्ता मुरुमीकरण आणि को.प. बंधारा ही दोन्ही कामे गावाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. आमदार काशिनाथ दाते सर यांनी मतदारसंघातील मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देत विकासकामांना गती दिली आहे. विशेषतः जलसंधारण आणि रस्ते विकासामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा लाभ होणार आहे. जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन विकासाचा निधी गावागावांत पोहोचविण्याचे काम आ. दाते सर सातत्याने करत आहेत. या कामांमुळे बाभुळवाडा परिसराच्या प्रगतीला निश्चितच नवी दिशा मिळेल.
>
> **-वसंतराव चेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य**

# शेवगाव-पाथर्डी पाणी योजनेच्या कामाची आ. राजळेंकडून पहाणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** जायकवाडी अभयारण्यातून पाईपलाईनचे काम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरू असून खाजगी फार्म हाऊस मालकाबरोबर चर्चा करून शेवगाव पाथर्डी पाणी योजनेतील अडचणी लवकरच दूर होतील ज्या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे तांत्रिक पूर्तता झाल्यावर दोन्ही शहरांसह जायकवाडी पाणी योजनेवरील गावांना नियोजनानुसार पिण्यासाठी पाणी मिळू शकेल अशी माहिती आमदार मोनिका राजळे यांनी दिली. जायकवाडी धरणातील भिंतीकडील भागातून दोन्ही शहरांना पाणीपुरवठा होणारी योजना पूर्णत्वाच्या मार्गावर असून अधिकारी पदाधिकारी लोकप्रतिनिधी व संबंधित ठेकेदारांबरोबर योजनेच्या कामाचा संयुक्त पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. पाथर्डी योजने बाबत संबंधित फार्म हाऊस चालुका बरोबर संवाद साधून यातून मार्ग काढण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे योजनेतील प्रशासकीय त्रुटी लवकरात लवकर दूर व्हाव्यात यंत्रणांनी अधिक समन्वयाने काम करावे यासाठी आढावा बैठक सुद्धा संपन्न झाली

बैठकीनंतर आमदार राजळे यांनी याबाबत माहिती दिली. यावेळी पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, पालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे, शेवगाव पालिकेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, माजी नगराध्यक्ष डॉ मृत्युंजय गरजे, पालिकेचे सत्ताधारी आघाडीचे नगरसेवक, पाणी योजना दोन्ही विभागाचे अधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



धरणाच्या भिंतीलगत असलेल्या पाण्याच्या उद्भवासह उपसा विहिरीची पाहणी केल्यानंतर संबंधित यंत्रणेंच्या प्रतिनिधींनी कामातील अडचणींची माहिती दिली. यावेळी बोलताना आमदार राजळे म्हणाल्या गेल्या तीन वर्षांपासून योजनेचे काम चालू आहे अंतर्गत पाणी वाटपासाठी ची पाईपलाईन मुख्य पाईप लाईन संबंधित वॉल आदींची कामे जवळजवळ पूर्ण झाली आहेत. गेले तीन वर्षे धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने हेड वर्कचे काम होऊ शकले नाही. धरण परिसरात अभयारण्य सुद्धा आहे. या क्षेत्रातून काम करायला केंद्र शासनासह राज्य शासनाची परवानगी लागते. स्थानिक प्रशासन व जिल्हा प्रशासनाकडून याबाबत पाठपुरावा सुरू आहे . केंद्र शासनाच्या परवानगीचे निकष पूर्ण करत प्रस्ताव सादर करायला प्रशासनाला अवधी लागला. दोन्ही योजने मुख्य पूल एकत्र असून जॅकवेल मात्र स्वतंत्र आहेत. पाथर्डी शहराच्या पाणीपुरवठा विभागाच्या जॅक वेल चे काम जवळपास पूर्ण झाले आहे. पर्यावरण विभागाच्या परवानगी नंतर शेवगावच्या योजनेतील अडथळे दूर होऊन ते काम पूर्ण होईल. सध्या शेवगावच्या आंबेडकर चौकातील अडथळे दूर होऊन पाईपलाईन ची जागा मोकळी झाल्याने लवकरच तेथेही कामाला प्रारंभ होईल. दोन्ही तालुक्यातील पाईपलाईनचे जंक्शन आंबेडकर चौकात आहे. शहरातील सुमारे १३५ किलोमीटर पाईपलाईनचे काम पूर्ण होऊन उपनगरांसह किरकोळ ६० किलोमीटर पाईपलाईनच्या कामाचे तांत्रिक आराखडे नाशिक येथील जीवन प्राधिकरण विभागाकडे सादर करण्यात आले आहेत. यामध्ये शेवगाव मधील वाढीव उपनगरांमधील कामे सुद्धा पूर्ण होतील. अधिक क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे अंदाजपत्रक शेवगावच्या उपनगरांसाठी तयार करण्यात आले आहे. धरण परिसरातील खाजगी फार्म हाऊसच्या मालकाबरोबर संवाद साधून योजनेच्या कामातील अडथळे दूर करण्याला प्राधान्य देण्यात आले आहे. चर्चेतून निश्चित मार्ग निघेल. सन २०५१ पर्यंतची संभाव्य लोकसंख्या गृहीत धरून योजनेचे कामकाज होत असल्याने पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघणार आहे. योजनेची प्रकल्प किंमत सुमारे ९६ कोटी रुपयांची आहे दरडोई १३५ लिटर पाणी मिळणार असून दररोज पाथर्डीला सुमारे ४० लाख लिटर पाणी मिळू शकेल. पाणीसाठा कमी न झाल्यास पाणबुडीचा सारख्या पाण्यावर तरंगणाऱ्या यंत्रणेचा वापर करून जॅकवेलमध्ये पाणी आणण्यासाठी पाथर्डीपालिकेने आर्थिक तरतूद करत तशी तयारी दर्शविली आहे. शेवगाव पालिका प्रशासनाने असा प्रस्ताव तयार करण्याची सूचना देण्यात आली आहे असे राजळे म्हणाल्या.

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री




## टाकळीभान - नेवासा रोडवर अज्ञात ट्रकच्या धडकेत बिबट्या ठार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील हॉटेल साई गायत्री व राज्यमार्ग ५० या रस्त्यावर अज्ञात ट्रकच्या धडकेत नर जाती असलेला बिबट्या जागीच ठार झाला. सध्या उन्हाची मोठी तीव्रता असून पाऊस न पडल्यामुळे हिंस्र प्राणी पाण्यासाठी व आपल्या भक्षणासाठी इतरत्र भटकत असताना शुक्रवारी ( दि. १२ ) जून रोजी सायंकाळी ८:३० बिबट्यारोड ओलडताना अचानक दिशा चुकल्याने बिबट्याला धडक बसली यात धडकेत जागीच ठार झाला. या घटनेची माहिती मिळताच तात्काळ फॉरेस्ट अधिकाऱ्यांना समजतात फॉरेस्ट अधिकारी विलास डेंगळे व राहुल कानडे घटनास्थळी दाखल झाले.पुढील वैद्यकीय तपासणीसाठी रवाना करण्यात आले.बिबट्याला बघण्यासाठी ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

# बाभुळगाव खालसा येथे ड्रग्ज इंजेक्शनचा साठा जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील बाभुळगाव खालसा येथील हायवे ब्रिजखाली प्रतिबंधित ड्रग्ज इंजेक्शनची विक्री करणाऱ्या एका युवकास मिरजगाव पोलिसांनी अटक केली असून या प्रकरणातील मुख्य आरोपी फरार झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ५८ हजार ६४० रुपये किमतीची ७७ प्रतिबंधित ड्रग्ज इंजेक्शने जप्त केली आहेत.

मिरजगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी ९ जून रोजी गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पप्पू ऊर्फ प्रविण लाला भोसले (रा. बाभुळगाव खालसा) याने रोहन भाऊसाहेब लाढाणे (वय २२) याच्याकडे 'मेफेन्टरमाइन सल्फेट इंजेक्शन आयपी' विक्रीसाठी दिल्याची माहिती पोलिसांना मिळाली.



या माहितीच्या आधारे पोलिसांनी हायवे ब्रिजखाली सापळा रचून रोहन लाढाणे याची झडती घेतली. त्याच्याकडे प्रतिबंधित इंजेक्शन आढळून आल्याने त्याला तात्काळ ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी मुख्य आरोपी प्रविण भोसले याच्या घराची झडती घेतली असता तेथे ७७ ड्रग्ज इंजेक्शन्सचा साठा मिळून आला. हा साठा जप्त करण्यात आला असून मुख्य आरोपी फरार झाला आहे.

पोलिस कॉन्स्टेबल सुनील दिलीप खैरे यांच्या फिर्यादीवरून रोहन लाढाणे व प्रविण उर्फ पप्पू भोसले यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १२३, १२५, २७८ तसेच औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम १९४० मधील कलम १८ (सी) व २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय झंजाड करीत आहेत. पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय विजय झंजाड, सहाय्यक फौजदार दत्तात्रय कासार तसेच पोलिस कर्मचारी पळसे, काकडे, गाडे, सपट व गोफणे यांनी ही कारवाई केली.ग्रामीण भागातही ड्रग्जचे जाळे पसरत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली असून अशा रॅकेटविरोधात कठोर कारवाईची मागणी होत आहे.

## विवाहित तरुणीला आमीष दाखवून संबंध ठेवण्याची मागणी, गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** आरोपीने एका २१ वर्षीय विवाहित तरुणीला पैसे दाखवुन म्हणाला कि, मी तुला पैसे देतो, तु माझे सोबत शारिरीक संबंध ठेव. तेव्हा तरुणीने त्याच्या कानाखाली मारली असता आरोपीने दोघा पती पत्नीला शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील मानोरी परीसरात घडली. २१ वर्षीय पिडीत तरुणी तीच्या कुटुंबासह मानोरी परिसरात राहते. दुपारच्या वेळी तरुणी घरासमोर असताना तेथे आरोपी आला आणि तरुणीकडे पाहुन डोळ्याने ईशारा करून पैसे दाखवुन म्हणाला कि, मी तुला पैसे देतो, तु माझे सोबत शारिरीक संबंध ठेव. तेव्हा तरुणीने त्याला त्याच्या कानाखाली मारली. त्याचा राग आल्याने आरोपीने शिवीगाळ करुन हातातील कड्याने मारहाण केली. तेव्हा तरुणीचा पती तेथे आला व त्याने पत्नीला सोडावले आणि म्हणाला कि, तु माझ्या बायकोला का मारहाण करतो. तेव्हा आरोपीने पतीला देखील शिवीगाळ करून कड्याने व लाथा बुक्यांनी मारहाण केली. आणि म्हणाला कि, तु मला एकटा भेट, तुला जीवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. पिडीत तरुणीने राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी अक्षय विठ्ठल गोलवड, मुळ रा. चंडकापुर, ता. राहुरी, हल्ली रा. मानोरी, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस हवलदार संभाजी बडे हे करीत आहे.

## डॉ तनपुरे कारखान्याच्या कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** राहुरी तालुक्यातील राहुरी फॅक्टरी येथील डॉ. तनपुरे कारखाना कामगार वसाहतीत दि. १२ जून रोजी दुपारच्या सुमारास एका ५७ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

राहुरी फॅक्टरीतील डॉ. तनपुरे साखर कारखान्याचे कर्मचारी बाळासाहेब तारडे, वय ५७ वर्षे, यांनी त्यांच्या राहत्या घराच्या समोर असलेल्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केल्याचे आढळून आले. ही घटना उघडकीस येताच स्थानिक नागरिकांनी तातडीने राहुरी पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर घटनास्थळी पोलीस हवालदार बाबासाहेब शेळके यांनी धाव घेत रुग्णवाहिका चालक रविंद्र देवगिरे यांच्या मदतीने त्वरित बाळासाहेब तारडे यांना जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी उपचारा पूर्वीच त्यांना मृत घोषित केले. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी राहुरी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला.

दरम्यान आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. मयत बाळासाहेब तारडे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले, दोन विवाहित मुली, जावई असा मोठा परिवार असून त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; तिघांवर गुन्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध वाळू वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत धडक कारवाई करत तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या कारवाईत दोन ब्रास वाळूसह ४ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक दिपक मेढे, संदीप मुरकुटे तसेच पोलीस अंमलदार विजय पवार, बाळासाहेब गुंजाळ, सुनील मालणकर, भगवान थोरात, विशाल तनपुरे आणि चालक अरुण मोरे यांच्या पथकाने ११ जून रोजी पहाटे छापेमारी केली. या कारवाईदरम्यान अवैधरित्या वाळूची वाहतूक होत असल्याचे आढळून आले.

याप्रकरणी विकास राजेंद्र ठोकळे (वय २३, रा. माळी गल्ली, राहुरी), काळू गुंजाळ (रा. मुलनमाथा, राहुरी) आणि प्रतिक बोबडे (रा. राजवाडा, राहुरी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# घारगाव पोलीस ठाण्यात अखेर 'खांदेपालट'

### अपयशी ठरलेल्या हेमंत थोरातांची गच्छंती; पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्याकडे सूत्रे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** संगमनेर तालुक्याच्या पठार भागाचे मुख्य केंद्र असलेल्या आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानल्या जाणाऱ्या घारगाव पोलीस ठाण्यात अखेर मोठा प्रशासकीय खांदेपालट झाला आहे. घारगाव पोलीस ठाण्याची स्थापना झाल्यापासून येथे पोलीस निरीक्षक दर्जाचे पद मंजूर आहे. मात्र, तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी या नियमाला बगल देत सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्याकडे या ठाण्याची जबाबदारी सोपवली होती. थोरात यांचा हा कार्यकाळ पठार भागासाठी अत्यंत निराशाजनक आणि कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडवणारा ठरल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये आहे.

**पोलीस निरीक्षक असताना सहाय्यकाकडे धूरा**

मंजूर पद 'पोलीस निरीक्षक' चे असतानाच 'सहायक पोलीस निरीक्षक' कडे दिली होती सूत्रे दिली. यापठार भागातील चोऱ्या, अवैध धंद्यांचे नवीन अधिकाऱ्यांसमोर मोठे आवाहन उभे आहे.

अखेर थोरात यांची अहिल्यानगर येथील एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली झाली असून, त्यांच्या जागी अहिल्यानगर शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब दगडू बोरसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी घारगाव पोलीस ठाण्याचा कार्यभार सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्याकडे दिला खरा, मात्र ते पठार भागातील कायदा व सुव्यवस्था राखण्यात सफशेल अपयशी ठरले.

त्यांच्या कार्यकाळात घारगाव परिसरातील गुन्हेगारीने उच्चांक गाठला होता. थोरात यांच्या कार्यकाळात पठार भागात अनेक गंभीर गुन्हे घडले. मात्र, यातील बहुतांश गुन्ह्यांचा अद्यापपर्यंत छडा लावण्यात घारगाव पोलिसांना यश आलेले नाही. पोलिसांच्या या सुमार कामगिरीमुळे तपास फाईल बंद पडल्यासारखा झाला असून, गुन्हेगारांचे मनोबल मात्र वाढले आहे.गेल्या काही महिन्यांत पठार भागातील दुर्गम गावांमध्ये चोऱ्या, घरफोड्या, शेती पंपांची चोरी आणि अवैध धंद्यांनी अक्षरशः उच्छाद मांडला होता. या बेकायदेशीर कृत्यांवर वचक निर्माण करण्यात थोरात यांचे प्रशासन पूर्णपणे हतबल ठरल्याचे पाहायला मिळाले. यामुळे स्थानिक जनतेत तीव्र असंतोष होता.या सर्व पार्श्वभूमीवर, घारगावला पुन्हा एकदा मूळ मंजुरीनुसार पूर्णवेळ 'पोलीस निरीक्षक' दर्जाचा अधिकारी मिळावा, अशी मागणी होत होती. त्यानुसार आता बाबासाहेब बोरसे यांच्या रूपाने अनुभवी अधिकारी घारगावला मिळाला आहे.

नवनियुक्त पोलीस निरीक्षक बोरसे यांनी पदभार स्वीकारताच त्यांच्यासमोर पठार भागातील विस्कटलेली घडी बसवण्याचे आणि गुन्हेगारी मोडून काढण्याचे मोठे आव्हान असणार आहे. थोरात यांच्या काळातील ज्या गंभीर गुन्ह्यांचा अद्याप तपास लागलेला नाही, त्यांचे गूढ उकलणे ही बोरसे यांची पहिली परीक्षा असेल. पठार भागात फोफावलेले अवैध धंदे, जुगार, आणि बेकायदेशीर धंदे पूर्णपणे मुळासकट उपटून टाकणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी होणाऱ्या चोऱ्यांच्या सत्राला लगाम लावून, शेतकऱ्यांचे साहित्य चोरीला जाण्यापासून रोखणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे असणार आहे.

आता नवीन पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे हे घारगाव पोलीस ठाण्याचा पदभार घेऊन पठार भागाला गुन्हेगारीमुक्त करण्यासाठी आणि खाकीची पत पुन्हा निर्माण करण्यासाठी काय पावले उचलतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## श्री हॉटेल लॉजिंगमध्ये अनैतिक व्यवसायाचा पर्दाफाश; आरोपी जेरबंद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्यातील हडीनिमगाव येथे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी पोलीस ठाण्याचा चार्ज घेतातच शुक्रवारी (दि.१२) रोजी १६.३५ वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे हंडीनिमगाव शिवारात श्री हॉटेल लॉजिंग येथे महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असल्याची अशी खात्रीशीर बातमी मिळाल्यानतर त्यांनी तात्काळ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सदरच्या ठिकाणी श्री हॉटेल लॉजिंग याठिकाणी पंचासह जावून छापा टाकून कारवाई केली.

यात ठिकाणी आरोपी मल्हारी शंकर नगरे, (वय ३४, व्यवसाय मंजुरी रा.खंडोबा मंदिर खुपटीरोड नेवासा), सतिष दिलीप मेटे, (वय ३०, व्यवसाय मंजुरी रा. बेलापूर ता. श्रीरामपूर जि.अहिल्यानगर,), लखन राजेंद्र भणगे, (वय २५, रा.हंडीनिमगाव ता. नेवासा) (मालक) काही पिडीत महिलांकडून वेश्या व्यवसाय करुन घेत असताना मिळून आल्याने त्याकामी कारवाई करण्यात आली. त्यांच्याविरुद्ध करुन नेवासा पोलीस ठाण्यात आणण्यात आले असता, महिला पोलीस अंमलदार भारती पवार यांची फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम १४३(३) सह स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास (प्रतिबंध) कायदा १९५६ चे कलम ३, ४, ५, ७, ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

तरी यापुढे पोलीस स्टेशन नेवासा हद्दीमध्ये अशाच प्रकारे अवैध धंदे चालकांवर छापेमारी करुन कारवाईचा बडगा उगरण्यात येणार आहे तसेच यापुढेही अशाच प्रकारे अवैध धंदे चालकांवर कारवाई चालु राहणार आहे ठणकावून सांगितले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन सो अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू सुचनेनुसार नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, पो.उ.पो.नि विकास पाटील, पो.हे.कॉ. अजय साठे, पोकॉ.सुमित करंजकर,पो.कॉ. नारायण डमाळे, पो. कॉ.श्रीनाथ गवळी, म.पो.कॉ.गिता पवार यांनी कारवाई केली.

### डिझेल भरण्याच्या वादातून पंपावरील कामगारांची दहशत

## लोखंडी कोयत्याने हल्ला, दोघे जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शनिशिगणापूर :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील झापवाडी शिवारातील मनिषा पेट्रोल पंपावर डिझेल भरण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोन युवकांना लोखंडी कोयत्याने व लाथाबुक्यांनी मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात एका कामगारासह अन्य अनोळखी कामगारांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी विश्वास नंदू डोळसे (वय १७) व वैभव छगन लोंढे (वय २२, दोघे रा.घोडेगाव) हे (दि.२० ) मे रोजी रात्री सुमारे ८.४० वाजता अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील झापवाडी शिवारातील मनिषा पेट्रोल पंपावर डिझेल भरण्यासाठी गेले होते. यावेळी डिझेल देण्याच्या कारणावरून पेट्रोल पंपावरील कामगार राहुल ढेरे (रा. लोहगाव) याच्याशी त्यांचा वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले.फिर्यादीनुसार,आरोपीने विश्वास डोळसे यांना शिवीगाळ व दमदाटी करत लाथाबुक्यांनी मारहाण केली.तसेच लोखंडी कोयत्याने हल्ला करून जखमी केले.या घटनेनंतर विश्वास यांनी त्यांचे सहकारी वैभव लोंढे यांना फोन करून घटनास्थळी बोलावून घेतले. मात्र, तेथे आल्यानंतर आरोपी व त्याच्या इतर साथीदारांनी वैभव यांनाही लाथाबुक्यांनी मारहाण केली.तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

मारहाणीत जखमी झालेल्या दोन्ही युवकांना तातडीने उपचारासाठी अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारानंतर त्यांनी सोनई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.या तक्रारीवरून (दि. ११ ) जून रोजी सोनई पोलीस ठाण्यात राहुल ढेरे व अन्य दोन ते तीन अनोळखी कामगारांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक २६७/२०२६ दाखल करण्यात आला आहे.


आरोपींवर भारतीय न्याय बीएनएस कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२)(३) व ३(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेमुळे घोडेगाव परिसरात खळबळ उडाली असून, सार्वजनिक ठिकाणी किरकोळ कारणांवरून होत असलेल्या हिंसक प्रकारांबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्ता गावडे करीत आहेत.

# अवैध गर्भलिंग वापरण्यात येणारे आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर / माळवाडगाव :** राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या गर्भलिंग निदान आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाच्या तपासात पोलिसांनी वाघोली (पुणे) येथून आणखी एक सोनोग्राफी मशीन जप्त केले.या प्रकरणाची व्याप्ती वाढतच चालली असून याआधी तपासात अनेक माहिती समोर आली आहेत.यात आरोपींची संख्या २१ वर पोहोचली आहेत.

या संपूर्ण कारवाईत अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी तपासाचे सूत्रे प्रभावीपणे हाताळली आहेत.त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने आरोपी डॉक्टर, एजंट, मेडिकल चालक आणि वैद्यकीय साहित्य पुरवठादार यांच्या साखळीपर्यंत पोहोचत अवैध व्यवसायाचे जाळे उघडकीस आणले.गुन्ह्यात अटक केलेल्या



डॉक्टर, एजंट, मेडिकल चालक, यांच्याकडे तपास करता त्याचप्रमाणे त्यांच्याकडून मिळून आलेल्या विविध बाबींचा तांत्रिक तपास करता वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये यांचे एजंटचे जाळे सक्रिय असल्याचे निष्पन्न होत आहे.

श्रीरामपूर विभागाचे अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या अवैध गर्भलिंग निदानविरोधी विशेष मोहिमेला आणखी एक मोठे यश मिळाले आहे.

या गुन्ह्यामध्ये काल रोजी वाघोली, पुणे या ठिकाणावरून अटक करण्यात आलेले डॉ. अतुल अंकुश जाधव (रा.वाघोली, पुणे) हा देखील बेकायदेशीरपणे गर्भलिंग निदान चाचण्या करत असल्याचे निष्पन्न झाले होते.यास अटक केली असून या आरोपीस न्यायालयाकडून सहा दिवसांची पोलीस कोठडी मिळाली होती. या डॉक्टरकडे बारकाईने विचारपूस करता त्याने देखील यापूर्वी मेडिकल साहित्याचा पुरवठा करणारा आरोपी नामे नरेंद्र ठाकरे याचे कडून बेकायदेशीरपणे



गर्भलिंगनिदान चाचण्या करणारे मशीन खरेदी केल्याचे दिसून आले.

आज रोजी नमूद आरोपीसह पोलीस पथक वाघोली येथे गेले असता, नमूद बेकायदेशीर पणे खरेदी केलेले अवैध गर्भलिंगनिदान साठी वापरण्यात येणारे सोनोग्राफी मशीन मिळून आले. या मशीनच्या साहाय्याने वाघोली, पुणे परिसरामध्ये सदर बेकायदेशीर गर्भलिंग निदान चाचण्या सुरू असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदरची मशीन गुन्ह्यामध्ये जप्त करण्यात आलेले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक एम सुदर्शन,अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती अधिक तपास करीत आहेत.